SBI PEN. ASSN.'S SAMVAD
स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

# संवाद

Price ₹ 3/-
VOL : 8
ISSUE : 4
OCTOBER : 2015
ऑक्टोबर : २०१५

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।

## दिवाळी विशेषांक



OCTOBER - 2015 SAMVAD

## Snap shots of the Annual General Meeting held at Nagpur on 23rd August 2015



(from Left) S/Shri.Mohinder Singh Sawhney, V.V.Gandhe, S.B.Gokhale, B.G.Dandekar, Sahebrao Desai, D.A.Kulkarni, A.P.Nimdeo & Sudhir Agrekar



Shri. S.B.Gokhale, Circle President, lighting the auspicious lamp



Shri. B.G.Dandekar lighting the auspicious lamp



Shri.V.V.Gandhe, Secretary, lighting the auspicious lamp



Shri. S.B.Gokhale, Circle President, addressing the gathering



Shri. B.G.Dandekar addressing the gathering



2

# संपादकीय

प्रिय सभासदमित्रांनो,

'संवाद'चा हा ऑक्टोबर २०१५ चा 'दिवाळी विशेषांक' आमच्या सहस्त्रावधी सभासद-वाचकांना सादर करतांना आम्हाला विशेष आनंद नि समाधान वाटत आहे. बारा वर्षांची म्हणजे तब्बल एक तपाची दमदार वाटचाल यशस्वीपणे पूर्ण करून 'संवाद'ने नव्या उत्साहाने नि आत्मविश्वासाने जुलै २०१५ ला तेराव्या वर्षात पदार्पण केले.

हा दुसऱ्या तपातील पहिलाच दिवाळी अंक असून त्यामध्ये 'संवाद'ची उज्ज्वल व अभिमानास्पद परंपरा जपण्याचा आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न केल्याचा प्रत्यय वाचकांना येईल असा आम्हाला विश्वास वाटतो. ही परंपरा अर्थातच वाचकांना सकस नि दर्जेदार साहित्यकृती सादर करून त्यांना बौद्धिक वा वैचारिक आनंद देण्याची आहे. दिवाळीच्या नित्याच्या फराळासोबतच हा वैचारिक भूक भागविणारा व मानसिक समाधान देणारा साहित्यिक फराळ आहे. दिवाळीतील फराळ आपली पोटाची भूक व जिभेची चव भागवील; तसंच हा वैचारिक वा अक्षरफराळ आपली बुद्धीची भूक व मनाची तहान भागवील.

मर्यादित पृष्ठसंख्येमध्येदेखील आम्ही तसा कसोशीने प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. वाचकांनी हे लक्षात घेऊन पृष्ठसंख्येचं आमच्यावरील बंधन लक्षात घेऊन आम्हाला प्रोत्साहन द्यावं ही नम्र विनंती. वाचनसंस्कृती लोप पावत असल्याची ओरड आजकाल वरचेवर आपल्या कानावर पडत असते. यात बऱ्याच अंशी तथ्य असलं तरी आमच्या मते केवळ पुस्तके वा ग्रंथ वाचनाचा ओढा कमी झालेला असून तो वृत्तपत्रवाचनाकडे अधिक प्रमाणात वळलेला आहे. तसेच हातातल्या 'मोबार्सल' वरील 'व्हॉटस्‌ॲप'वर 'मेसेजेस'द्वारा क्षणाक्षणाला येणारे माहितीपर व मनोरंजनात्मक संदेश ज्यातून विविध साहित्यगुणांचंही दर्शन घडते- ते वाचण्यात व त्यावरील प्रतिक्रिया देण्यात आणि 'चॅटिंग' करण्यात तरूणांचाच नव्हे तर अनेक ज्येष्ठांचाही बराच वेळ खर्च होतो. त्याशिवाय दूरदर्शनवरील विविध वाहिन्यांद्वारे दिवसाचे चोवीस तास मनोरंजनात्मक प्रबोधनात्मक नि चर्चात्मक कार्यक्रम पाहण्यात वाचकांचा वेळ जात असतोच.

रोज घडणाऱ्या महत्त्वाच्या घटनांची माहिती नि प्रत्यक्ष दृश्येही दूरदर्शनवरून ऐकण्याची नि पाहण्याची सोय उपलब्ध असल्यामुळे वाचनाला पुरेसा वेळ मिळत नाही ही वस्तुस्थितीदेखील लक्षात घ्यायला हवी. अर्थात आम्हाला किंवा 'संवाद'ला या गोष्टींची फारशी चिंता वाटत नाही. कारण आमचे सहस्त्रावधी सभासद 'संवाद'ची आतुरतेने वाट पाहणारे आहेत, संपूर्ण 'संवाद' उत्सुकतेने वाचणारे आहेत. त्यासंबंधी प्रतिक्रियातून आपापल्या भावना आत्मीयतेने कळविणारे आहेत. त्यांच्या भावनांचा आम्ही सदैव आदर करतो. 'संवाद'वरील व पर्यायाने आमच्यावरील लोभ कायम ठेवावा ही सभासदांना विनंती. 'संवाद'चा हा दिवाळी विशेषांक आकर्षक स्वरूपात सिद्ध करणाऱ्या लेखक-कवि, प्रकाशक, जाहिरातदार आदी सर्व घटकांचे मनापासून आभार. सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा.

**क्रांतिसेन रामचंद्र आठवले**
मो.९८६९९४१६९१

# Do not forget to furnish Life Certificate to the Bank during November every year

The Life Certificate can be furnished to any branch of State Bank of India, even in foreign countries.
Kindly note following instructions in respect of submission of Life Certificate

************************************************

The Bank has issued instructions vide e-Circular No. CDO/P&HRD-PPFG/29/2011-12 dt. 3rd June 2011 to furnish Life Certificate in the following format. We reiterate the instructions as under :

1) To make it mandatory for all IBI/SBI/SBS/SBIN Pensioners and Family Pensioners to furnish life certificate in the month of November each year on the prescribed format, failing which pension will be stopped two months thereafter i.e. from the month of January.

2) Life certificate in the physical form may be submitted in the prescribed format by the pensioner / family pensioner not necessarily to the home branch where his / her pension account is maintained but to any branch. The acknowledgement of having received the Life Certificate will be issued to the pensioner / family pensioner by the Branch where the Life Certificate is submitted. After receiving the Life Certificate the branch (Home / Non Home) will verify the signature / thumb impression from CBS and update the same in the related HRMS site. **Life Certificate can be updated in the HRMS site by any officer of the branch**.

3) When Life Certificate is submitted at a Non Home Branch, after updating the record in HRMS, the branch shall forward the original Life Certificate to the Home Branch and retain a copy of the same for their record.

********************************************************************************************

Federation has sought clarifications from the Bank in respect of submission of Life Certificate by those pensioners who happen to be in foreign countries during November. It is clarified that the Life Certificate can be furnished by such pensioners (i) to any branch of State Bank of India **OR** (ii) any other Indian Public Sector Bank located in that country **OR** (iii) arrange for obtaining their Life Certificate attested from an authorised official of the Embassy / High Commission of India or Counsel of India. After obtaining the Life Certificate duly attested as mentioned above, the pensioner may forward the same to their Pension-paying Branch immediately in November itself to avoid stopage of pension.

---

ANNEXURE

**IBI/SBI/SBS/SBIN PENSION LIFE CERTIFICATE**

Certified that Shri / Smt .......................................................a pensioner of the Bank appeared before me today and signed / affixed his / her L.T.I. below in my presence.

______________________________ ______________________________

Signature / L.T.I. of the Pensioner Branch Manager / Gazetted Officer

Date ........................... (Office seal)

Name of the Pensioner : ________________________
P.F.Index Number : ________________________
Pension A/c No. : ________________________
Name and Code of the
Pension paying Branch : ________________________

---

**ACKNOWLEDGEMENT**

(to be given to the applicant by the Branch receiving the Life Certificate)

Received from Shri/Smt.__________________________________________________
his / her Life Certificate on ______________

Signature of the officer
receiving Life Certificate
Seal of the Branch

Date ________________
Branch ______________

## स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे
## नाशिक युनिट - वार्षिक मेळावा
## नोटीस

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनच्या नाशिक युनिटचा वार्षिक मेळावा शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता खालील ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास मुंबई सर्कल प्रेसिडेंट श्री.एस.बी.गोखलेसाहेब उपस्थित राहणार आहेत.

**वैराज कलादालन,**
कुलकर्णी कॉलनी, सोनी पैठणी जवळ,
डॉ.लेले हॉस्पिटल मागे, शरणपूर रोड, **नाशिक**
(फोन) ०२५८-२५८११७३

**कार्यक्रम पत्रिका**

१) उपस्थितांचे स्वागत व अध्यक्षांचा सत्कार
२) मृत सभासदांना श्रद्धांजली
३) नवीन सभासदांचे स्वागत
४) उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन
५) वार्षिक हिशोब मंजुरी
६) आयत्या वेळीचे विषय
७) अध्यक्षीय समारोप
८) आभार प्रदर्शन

तरी नाशिक जिल्ह्यातील सर्व सभासदांनी या मेळाव्यास उपस्थित रहावे ही विनंती.

**भिमसिंग ठाकूर** — सेंट्रल कमिटी मेंबर
**नाना गडाख** — सेक्रेटरी

### Congratulations !

Shri.Maheshkumar Parekh, our member from Borivali (Mumbai) has successfully completed 21 kms 'Satara Hill Ultra Marathon' in September 2015 at the age of 62 for which he deserves many compliments. After his retirement in April 2013 he continued his passion for running and has participated in many such Marathon running competitions so far. Besides this, he is a Birdwatcher, a Singer and learning harmonium & vocal music. He has also completed Chardham Yatra once & Amarnath Yatra for 5 times. We wish him all the success in persuing his hobbies and a healthy life !

***- Secretary***

## कोल्हापूर युनिट -
### युनिटच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनच्या कोल्हापूर युनिटची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.४/९/२०१५ रोजी खरे मंगल कार्यालय, राजारामपुरी, कोल्हापूर येथे आयोजित केली होती. सभेस सांगली, सातारा, इचलकरंजी, गारगोटी, गडहिंग्लज येथूनही सभासद आले होते. सकाळी १०.३० वाजता 'वंदे मातरम्' म्हणून सभेस सुरुवात झाली.

व्यासपीठावर युनिटचे अध्यक्ष श्री.बी.के.गायकवाड, सेक्रेटरी सौ.पद्मा बेकीनकर, कोषाध्यक्ष श्री.डी.डी.काळे, तसेच पुणे झोनल सब्-सेंटरचे सेक्रेटरी श्री.व्ही.आर.कुलकर्णी व इतर पदाधिकारी होते. पाहुण्यांच्या व अध्यक्षांच्या हस्ते दीप-प्रज्वलन झाल्यानंतर दिवंगत सभासदांना, तसेच भारताचे माजी राष्ट्रपती 'भारतरत्न' डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अध्यक्षांनी श्री.व्ही.आर.कुलकर्णी यांचे स्वागत केले. तसेच नविन सभासदांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. गेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत व गतवर्षाचा अहवाल सौ.बेकीनकर यांनी सादर केला. आजी व माजी पदाधिकाऱ्यांच्या आवाहनानुसार ज्या सभासदांनी आपल्या युनिटसाठी व इतर उपक्रमासाठी देणग्या दिल्या त्या सर्व देणगीदारांचे श्री.चौगुले यांनी मन:पूर्वक आभार मानले. श्री.काळे यांनी २०१३-१४ या वर्षाचा ताळेबंद सादर केला. तसेच 'संवाद' साठी देणगी दिलेल्या सर्वांचे आभार मानले.

यानंतर, सामाजिक जाणिवेतून युनिटतर्फे १०वी च्या दोन गरीब विद्यार्थिनींना मदत म्हणून प्रत्येकी रु.२५००/- च्या रकमेचे चेक देण्यात आले. तसेच एक महिला पेन्शनर कु,पुष्पा तांदळे यांना, त्यांच्या आजवरच्या कामाबद्दल 'सौ.जयश्री वालावडकर पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले.

२५/९/१४ ते ४/९/१५ या कालावधीत वयाला ७५ वर्षे पूर्ण झालेल्या सभासदांचा स्मृतीचिन्ह व गुलाब पुष्प देऊन मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच श्री.एस.बी.उमदी यांचा पंचाहत्तरीनिमित्त, तसेच त्यांनी केलेल्या पेन्शनरांच्या सेवेबद्दल चांदीचे नाणे देऊन त्यांचा व त्यांच्या पत्नी सौ.गौराबाई यांचा हार्दिक सत्कार करून गौरवण्यात आले. त्याच बरोबर श्री.आर.आर.कुलकर्णी यांना त्यांच्या आजवरच्या कार्याबद्दल चांदीचे नाणे देऊन 'जीवन गौरव पुरस्काराने' गौरवण्यात आले. श्री.बाळासाहेब शेळके यांनी नुकतीच अमरनाथ यात्रा पूर्ण केली. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच श्री.एस.पी.कुलकर्णी हे 'योग' शिकवतात त्याबद्दल त्यांचाही गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. आपले पुणे येथील एक पेन्शनर श्री.एस.एन.भावे यांनी टाकाऊ पदार्थांपासून तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन सभागृहात मांडण्यात आले होते. हे

प्रदर्शन पाहून अनेकांनी पसंतीची पावती दिली व श्री.भावे यांचे कौतुक केले. तसेच युनिटने गेल्या वर्षी आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे फोटो सभासदांच्या माहितीसाठी सभागृहात लावण्यात आले होते.

कोल्हापूर येथील बँकेच्या रिजनल ऑफिसतर्फे पेन्शनरांचा मेळावा या सभेच्यावेळी आयोजित करण्यात आला होता. ए.जी.एम. श्री.अतुल श्रीवास्तव व श्री.वैद्य यांचे श्री.गायकवाड यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. श्री.आर.आर.कुलकर्णी यांनी पेन्शनर्सच्या मागण्या व अडचणी मांडल्या. श्री. श्रीवास्तव साहेबांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पेनशनर्सच्या अडचणींचे निराकरण करून मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल असे आश्यासन दिले. नंतर श्री.गायकवाड यांचे अध्यक्षीय भाषण झाले व त्यांचे नंतर सौ.पंढरपुरे यांनी सर्वांचे आभार मानले. सौ.राजाध्यक्ष व श्री.रूकडीकर यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करणेसाठी सर्वश्री. पोंक्षे, मुधाळे, हळबे, बेकीनकर, इंगळीकर, वाडकर, उमदी, स्वामी, कोरडे अशा सर्वांची मदत झाली. राष्ट्रगीतानंतर सुग्रास भोजनाचा आस्वाद घेत मिटींगची सांगता झाली.

सौ. पदमा बेकीनकर, सेक्रेटरी

**************

## ‘पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा’

किती दर्दभरी सत्य ह्यात दडलयं. खरंच. २ ऑक्टोबरची रात्र काळरात्र ठरली. रात्री ११ वा. काळजाचा ठोका चुकवणारा फोन आला. आपले भालचंद्र खरे गेले. मृत्युसमयी ते आपल्या असोसिएशनच्या ठाणे-मुलुंड विभागाचे सचिव होते. तसेच ते १५-११-२००५ ते १९-०१-२००९ या तीन वर्षाच्या काळात आपल्या फेडरेशनचे खजिनदारही होते. त्यांचा जन्म ८-१२-१९४५ चा. ते आपल्या असोसिएशनचेच नव्हे तर सर्व पेन्शनर्सचे आधारस्तंभ होते. सर्वांचेच चहाते. काळाने त्यांच्यावर झडप घातली. हो झडपच घातली. शेवटच्या क्षणापर्यंत ते कार्यमग्न होते. अशा बेसावध वेळी त्या पुण्यात्म्याला देवाज्ञा झाली. त्यांच्या पत्नी, मुलं, इतर नातेवाईक व आपल्यातील प्रत्येकाला ही बातमी चटका लागून राहिलीय.

स्टेट बँकेच्या आपल्या कुटुंबात जी अनेक चांगली माणसं आहेत, होती, त्यातील श्री.भालचंद्र खरे. वडाळा येथील बँकेच्या स्टेशनरी डिपार्टमेंट येथून त्यांची बँकेतील कारकीर्द सुरू झाली. ठाणे ब्रँचला आल्यानंतर, ऑफिसर झाल्यावर मुंबईतील व बाहेरील अनेक ब्रँचेस मध्ये त्यांनी कामे केली. शेवटची ब्रँच रायगड जिल्ह्यातील महाड होती. प्रथमपासूनच बँकेतील कोणतेही काम अत्यंत अभ्यासपूर्ण, नियमबद्ध पद्धतीने करायचे. अगदी तन-मन अर्पून. त्यांच्या कामाचा आवाका बघून ‘झोकून देणं’ म्हणजे काय हे कळायच. कोणतेही काम ‘माझं नाही’ अस त्यांना कधी वाटलंच नाही. शांत, संयमी, काहीसं अबोल पण सकारात्मक असं व्यक्तिमत्व. चिडणं, संतापणं नाहीच. त्यांच आध्यात्मिक मन व सामाजिक मन शिगोशिग भरलेलं. एका वाक्यात वर्णन करायचं तर ‘निर्मळ मनाचा अजात शत्रू’.

२००१ साली व्ही.आर.एस्. घेतली. त्यानंतरचं उर्वरित आयुष्य त्यांनी पेन्शनर्सचे सर्व प्रकारचे प्रश्न सोडवण्यात व्यतित केलं. फॅमिली पेन्शन किंवा त्याचे ॲरिअर्स मिळवून देणे अशी छोटी-मोठी कामे निरपेक्ष वृत्तीने करायचे. फेडरेशनचे सर्वेसर्वा बी.जी.दांडेकर यांनी त्यांचे हे गुण हेरूनच त्यांना फेडरेशनचे खजिनदार केले. तेही काम त्यांनी उत्तमरित्या सांभाळलं. ठाण्याच्या स्टेट बँक पेन्शनर्सच्या सांस्कृतिक मंडळाचेही ते खजिनदार होते. तेव्हाही कार्यक्रम ठरवण्यात ते अग्रेसर असायचे. आपल्या सर्वांनाच त्यांची उणीव जाणवेल ह्यात शंकाच नाही.

ईश्वर त्यांच्या कुटुंबियांना हा आघात सहन करण्याचे सामर्थ्य देवो. त्यांच्या पुण्यात्म्यास चिरशांती मिळो हीच आम्हा सर्वांची परमेश्वराजवळ प्रार्थना!

**वसंत कर्वे,** सचिव
स्टेट बँक पेन्शनर्स सांस्कृतिक मंडळ
(ठाणे-मुलुंड)

(कै.भालचंद्र खरे - निवास भ्रमणध्वनी : ९८१९१७३८७१ / ९८१९१७३३५३)

### Obituary

Shri.Bhalchandra P. Khare, 69, passed away on 2nd October 2015 due to massive heart attack. He was very much active in Association, especially in Thane Unit of S.B.I. Pensioners' Association (Mumbai Circle) as well as in welfare activities for pensioners. He was ex-Treasurer of our Federation during 15th November 2005 to 19th January 2009. He is survived by his spouse Smt.Vasudha, son & daughter.

***- Secretary***

## INTERNATIONAL YOGA DAY

Yoga is union of individual consciousness with universal consciousness. In other words, we can say, Yoga is union with God. It came into existence in prevedic period over 5000 years ago. Five points of Yoga are, proper exercises (aerobic exercises will also do), proper breathing, proper relaxation, proper diet, positive thinking and meditation. Vivekananda was the first Hindu teacher to actively advocate Yoga to the Western audience.

In the book Karma-Yoga of Vivekananda, there is a story of Karma Yogi Housewife. A young Sanyasi, who went to forest, worshiped and practiced Yoga for a long time. He was sitting under a tree when dry leaves fell upon his head. He looked up and saw a crow and crane fighting on the top of the tree which was the cause of leaves falling on his head. He angrily glanced at them when flash of fire burnt the birds. He was glad at this development of power of a Yogi.

He went to the town to beg his bread at a door of a house and begged. A voice came from the house : "Wait a little, my son.". The Yogi thought how could she dare to make him wait. The voice came again from the house, "Here is neither crow nor crane". When the woman came out he fell at her feet and asked how she could read his thoughts.

The lady said, I am a common housewife, I had to make you wait as my husband was ill and I was nursing him. All my life I have struggled to do my duty. Before marriage, she was doing duty to parents with love & devotion. She was illumined doing her duty with devotion & without any expectations. She further directed him to a market of nearby town to a butcher viz Vyadha. When the Sanyasi approached Vyadha, the later asked him whether the lady sent him and requested to take a seat. After his business, Vyadha took him home, washed his old parents, fed them and then came to the Sanyasi to discuss the subject.

The Sanyasi was astonished at the knowledge of Vyadha and asked him why was he doing ugly work. Vyadha said that the work was taught to him as a source of livelihood by doing the job honestly. He also said that he was vegetarian, although he was selling meat as a source of livelihood. Vyadha's lecture to the Sanyasi forms a part of the Mahabharata and is called Vyadha-Gita.

To quote Vivekananda from his book Karma-Yoga, When you are doing any work, do not think of anything beyond. Do it as worship, as the highest worship, and devote your whole life to it for the time being. Thus, in the story, the Vyadha and the woman did their duty with cheerfulness and whole-heartedness; and the result was that they became illuminated; clearly showing that the right performance of the duties of any station in life, without attachment to results, leads us to the highest realization of the perfection of the Soul.

This is an excellent example of getting illuminated as Karma-Yogi. In other words, even without meditation and breathing techniques, Karma-Yogis can emerge while doing any activity self-lessly with devotion, right attitude and excellent motive.

Chapter III of Bhagavadgita titled "Karmayoga", or the "Yoga of Action" states importance of the performance of duty, in a detached way, and the necessity of performing sacrifices. It also states the ways to overcome desire.

Man does not attain freedom from action without entering into action; nor does he reach perfection merely by ceasing to act. He who controls the organs of sense and action by the power of his will, remaining unattached, undertakes the Yoga of Action through those organs. Man is bound by his own actions except when it is performed for the sake of sacrifice. Hence duties should be performed

efficiently, free from attachment, for the sake of sacrifice alone. Therefore, one should go on efficiently doing his duty without attachment. Doing work without attachment, man attains the Supreme. Hence, Krishna advised Arjuna to dedicate all actions to him and fight the war at Kurukshetra. This is the essence of Krishna's advice to Arjuna as also to all of us.

Vivekananda has stated in his book "Karma-Yoga' that Buddha was the man who carried his teachings on Karma-Yoga into practice. Buddha is the only prophet who said, " I do not care to know your various theories about God. What is the use of discussing all the subtle doctrines about the soul? Do good and be good and this will take you to freedom and to whatever truth there is." This great philosopher, preaching the highest philosophy, yet has the deepest sympathy for the lowest of animals, and never put forth any claims for himself. He is the ideal Karma-Yogi, acting entirely without motive, and the history of humanity shows him to have been the greatest man ever born. He is the first great reformer the world has seen.

Our honourable Prime Minister, Narendra Modi in his UN address last year, suggested that International Yoga Day be observed every year on 21st June, it being the longest day of the summer solatice. The suggestion was accepted for heralding new era of peace all over the world. On the first International Yoga Day at New York's Times Square, 181 out of 193 countries participated and the UN Security General Bahn Ki-Moon performed some of the Asanas.

The program led by Narendra Modi at Rajpath had record attendance of gathering of about 36,000 participants from 84 nations, thus making two Guinness Records. Narendra Modi deserved very high credit for sincerely initiating noble movement the world over.

There are four main paths of Yoga viz. Karma Yoga, Bhakti Yoga, Jnana Yoga & Raj Yoga. Each is suited to different temperament or approach to life. Vivekananda has stated, "Each one of our Yogas is fitted to make man perfect even without the help of others, because they have all the same goal in view. The Yogas of work, of wisdom and devotion are all capable of serving as direct and independent means for the attainment of Moksha. Yoga does not mean only Asanas.

Bhakti Yoga for salvation will not serve the purpose if it is performed with intention of getting some benefit. Saint Meera was the wife of eldest son of Bhojraj Singh, ruler of Mewar. She gave up everything for pure and selfless bhakti for Krishna and she became yogi. Karma Yogis can derive knowledge and wisdom as in the case of common housewife & Vyadha stated above.

Therefore, for spreading Yoga, it is not enough to disseminate knowledge of Asanas alone. We have large number of workers and devotees of God. There is a need to propagate ways for self-less service with devotion, right attitude, excellent motive without any expectation. It is necessary to spread these examples to educate them.

I read Karma-Yoga of Vivekananda in May 1954 by borrowing it from the Library of my native place. That time, it was costing Rs.2.50 only. I purchased it alongwith other books of him on Raj Yoga, Bhakti Yoga etc. I observed that while reading it now, some more meaning is revealed. I would suggest that those who are interested in Yoga should purchase Karma-Yoga book and study it.

This article is based on Vivekananda's book and references to various Yoga aspects in google. While writing the article for the benefit of fellow pensioners, I have gained a lot of knowledge to put into practice.

***- S. V. NAIK,*** Andheri (E), Mumbai-69
Cell : 9821127616

## पुण्यात असलेल्या अनेक देवळांची/देवतांची वैशिष्ठ्यपूर्ण नावे व त्या मागचा इतिहास

विल्यम शेक्सपिअरने म्हटलेलंच आहे की 'नावात काय आहे?' याचा गंमतीशीर प्रत्यय घ्यायचा असेल तर पुणे शहर परिसरातील अनेक देवांच्या विचित्र वाटणाऱ्या नावांच्या पाठीमागचा इतिहास जाणून घ्यावा लागेल. आणि मग असा प्रयत्न करून पहावा असे मी ठरवले. आणि जसजशी माहिती मिळत गेली तसतशी माझी उत्सुकता वाढत गेली. कांही नावांच्या मागे ऐतिहासिक संदर्भ होता, तर काही नावांच्या मागे देवालासुद्धा मनुष्यस्वभावानुसार, एखाद्या व्यक्तीला सामाजिक समजुतीनुसार किंवा तेथील परिसरावरून नावे ठेवावीत, तशी नावे 'पडलेली' किंवा ठेवलेली आढळली. अशा कांही वैशिष्ठपूर्ण नावे असलेल्या मंदिरांचा मागोवा घेण्याचा हा प्रयत्न. पुण्यात तशी असंख्य मंदिरे आहेत. पण यातील सुप्रसिद्ध असलेल्या मंदिरांचा समावेश येथे केलेला नाही. (उदा. ओंकारेश्वर मंदिर, जंगली महाराज, पर्वती, तुळीबागेतील राम मंदिर, दगडुशेठ हलवाई गणपती मंदिर इत्यादी.) तसेच विस्तार भयास्तव फक्त कांही वैशिष्ठ्यपूर्ण नावे असलेल्या मंदिरांचाच समावेश या लेखात केला आहे.

### मारुती मंदिरे -

१) **बटाट्या मारुती -** हे मंदीर शनिवारवाड्याच्या समोरील पटांगणात आहे. या पटांगणात पेशवाई काळात बटाट्याचा बाजार भरत असे. पुण्याच्या जवळपासच्या खेड्यातील शेतकरी आपापल्या शेतात पिकवलेला भाजीपाला, विशेषत: बटाटे विक्रीसाठी या पटांगणात विक्रीसाठी घेऊन बसत असत. त्यामुळे तेथे असलेल्या मारुती मंदिराला 'बटाट्या' मारुती मंदीर असे संबोधू लागले. आता जरी तेथे बाजार नसला तरी मारुती मंदिराचे नाव कायम आहे.

२) **वीराचा मारुती -** हे मंदिर शनिवारवाड्याकडून अहिल्यादेवी हायस्कूलकडे जाणाऱ्या रस्त्यावर, साधना प्रकाशन संस्थेच्या ऑफिसजवळून ओंकारेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या सुरूवातीलाच, पिंपळाच्या वृक्षाच्या खाली आहे. क्षत्रिय-मराठा समाजातील कांही कुटुंबात नवसाने मुलगा झाल्यावर त्याला पाचव्या वर्षी 'वीरा'सारखे सजवून, हातात छोटी तलवार किंवा सुऱ्यासारखे हत्यार घेऊन (त्यावर लिंबू टोचून), वाजतगाजत या मारुतीच्या दर्शनाला घेऊन येत असत. म्हणून हा वीराचा मारुती.

३) **भिकारदास मारुती -** हे मंदिर सदाशिव पेठेत बाजीराव रोड वरील टेलिफोन भवन इमारती समोरील महाराणा प्रताप बागेजवळ आतल्या बाजूला आहे. ते भिकारदास नावाच्या पुण्यातल्या एका महाराष्ट्रेतर सावकाराने बांधले असा उल्लेख कांही लेखकांच्या ऐतिहासिक लिखाणात आढळतो. अर्थात 'भिकारदास' हे नाव त्या व्यक्तीच्या आई-वडिलांनी कदाचित नवसाने झाला म्हणून ठेवले असावे. याच देवळात स्वातंत्र्यपूर्व काळात, स्वातंत्र्य चळवळीने प्रेरित होऊन राष्ट्रीय किर्तनकार श्री.विनायकबुवा पटवर्धन, श्री.आफळेबुवा इत्यादी सुप्रसिद्ध किर्तनकारांची देशभक्तीपूर्ण किर्तनं-आख्यानं होत असत.

४) **गवत्या मारुती -** हे मंदिर अप्पा बळवंत चौकातून लक्ष्मीरोडकडे जायला लागल्यावर डाव्याबाजूस आहे. पूर्वी येथे गवताचे भारे आणून या मंदिराजवळ रस्त्यावर विक्रीसाठी शेतकरी ठेवत असत असे म्हणतात. म्हणून गवत्या मारुती.

५) **जिलब्या मारुती -** हे मंदिर शनिपाराकडून मंडईकडे जाणाऱ्या रस्त्यावर आहे. पूर्वी या मंदिर परिसरात हलवायांची, विशेषत: जिलबी विक्रीची दुकाने होती. आणि असे सांगतात की हलवाई-मंडळी रोज मारुतीला जिलबीचा हार बनवून घालत असत.

६) **पत्र्या मारुती -** हे मंदिर नारायण पेठेत मराठी ग्रंथालयाजवळ आहे. या मंदिराच्या भोवती पत्र्याची शेड बांधलेली आहे.

७) **नवश्या मारुती -** हे मंदिर सिंहगड रोडवर 'पु.ल.देशपांडे उद्यानासमोर आहे. हा नवसाला पावतो अशी समजूत आहे.

८) **डुल्या मारुती -** हा लक्ष्मीरोडवर रविवार पेठेत आर्यभूषण थिएटरजवळ आहे. 'डुल्या' नाव का पडलं हे समजले नाही.

९) **शकुनी मारुती -** हे मंदिर नू.म.वि. प्रशालेशेजारील 'आनंदाश्रमा' समोरून लोखंडे तालीम चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर आहे. याची पूर्वपीठिका माहित नाही.

१०) **सोन्या मारुती -** हे मंदिर लक्ष्मीरोडवरील बोहोरी आळीकडून येणाऱ्या रस्त्यावरील चौकात आहे. या मंदिराच्या आसपास पूर्वीपासून सराफांची दुकाने खूप आहेत. या मंदिराला ऐतिहासिक महत्त्व आहे. या चौकाजवळच तांबोळी मशीद आहे. नमाजाच्यावेळी देवळाची घंटा वाजवू नये असा मुसलमानांचा आग्रह, तर मारुतीच्या दर्शनाला आल्यावर/आरती करतांना आम्ही घंटा वाजवणारच हा हिंदूंचा अट्टाहास. वाद विकोपाला गेल्यावर सरकारने हस्तक्षेप करून नमाजाचेवेळी घंटा वाजवू नये असा हुकूम काढला. तेव्हा हिंदूंनी सत्याग्रह केला व त्याचे नेतृत्त्व सुप्रसिद्ध वकील ल.ब.भोपटकर यांनी केले. त्यावेळी पोलिसांना चकवून हिंदूंनी घंटानाद केला. त्यावेळेपासून सोन्या मारुती प्रसिद्ध झाला.

११) **दंगल्या मारुती -** बुधवार पेठेत वसंत टॉकिजजवळ शालूकरांच्या बोळाच्या तोंडाशी १८५७ च्या धामधुमीत आण्णासाहेब पटवर्धनांनी या मारुती मंदिराची स्थापना केली.

१२) **बंदीवान मारुती -** हे मंदीर गुरुवार पेठेत फुलवाला चौकाजवळ आहे.

१३) **भांग्या मारुती -** हे मंदिर बुधवार चौकातून जिजामाता बागेकडे जाणाऱ्या रस्त्यावर डाव्याबाजूस शिवाजी रस्त्यावरच आहे.

**१४)ऊंटाड्या मारुती –** हे मंदिर रास्ता पेठेतील के.ई.एम.हॉस्पिटलसमोर रस्त्याच्या मध्ये आहे. याला ऊंटाड्या हे नाव बाजीराव पेशव्यांच्या काळात पडले. कारण पेशव्यांच्या सैन्यातील ऊंटांचा काफिला शनिवारवाड्याच्या पूर्वेकडील भागातील सरदार रास्ते यांचे वाड्याचे मागील बाजूच्या मैदानावर वेशीबाहेर तळ ठोकून असे. त्यावेळी त्या काफिल्यासोबत रहाणाऱ्या नोकर-चाकरांच्या सोईसाठी पेशव्यांनी हे मारुती मंदिर बांधून दिले. म्हणून यास उंटाड्या मारुती म्हणायला लागले.

**१५) विसावा मारुती –** हे मंदिर अलका टॉकीजकडून पूना हॉस्पिटलकडे जाण्याच्या रस्त्यावर, हॉस्पिटलच्या अगदी जवळच समोरच्याच बाजूला आहे. पूर्वी याच्या आसपास कांही वस्ती नव्हती. मुठा नदीच्या काठावरील जवळच असलेल्या स्मशानभूमीकडे 'अंत्ययात्रा' या मंदिरापाशी आल्यावर खांदेकरी अगदी थोडा वेळ थांबून कांही क्षण विसावा घेत असत. म्हणून हा विसावा मारुती.

**इतर मंदिरे :**

**१६) खुन्या मुरलीधर –** हे मंदिर १७९७ साली पेशव्यांचे सावकार श्री.दादासाहेब गद्रे यांनी बांधले. नावाच्या मागचा इतिहास मनोरंजक आहे. श्री.गद्रे यांनी मुरलीधराची सुंदर मूर्ती जयपूरहून तयार करून आणली. मूर्तीचे देखणेपण पाहून श्री.नाना फडणीसांना वाटले की ही मूर्ती आपल्याजवळ असावी व त्यासाठी त्यांना देऊळ बांधावेसे वाटले. म्हणून नानांनी गद्रे यांचेकडे मूर्ती मागितली. पण मूर्ती देण्यास श्री.गद्रे यांनी नकार दिला. नाना हट्टाला पेटले. या वादातून गद्रे यांनी मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेच्या दिवशी कार्य निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी व तिचे रक्षणासाठी ईस्ट इंडिया कंपनीचे सैन्य मागविले. इकडे नाना फडणीसांनी मूर्ती पळवून नेण्यासाठी अरबी सैन्याची मदत घेतली. या दोन्ही सैनिकांत चकमक होऊन रक्तपात झाला. काय गंमत आहे पहा, देवाची मूर्ती हिंदूंची, रक्षण करणारे ख्रिश्चन आणि पळविण्याचा प्रयत्न करणारे अरबी मुसलमान. शेवटी नानांचा प्रयत्न फसला व त्यानंतर नानांनी बेलबागेचे विष्णु मंदिर बांधले. ते सध्याच्या सिटी पोस्ट चौकाजवळच आहे. अशी ही मुरलीधर मंदिराची रक्तरंजित कहाणी. म्हणून हे खुन्या मुरलीधराचे मंदिर.

**१७) सारसबागेतील गणपती –** याला पूर्वी 'तळ्यातला गणपती म्हणत असत. कारण जवळ जवळ ५०-५५ वर्षांपूर्वी येथे तळे होते. टिळक रोड कडून पर्वतीकडे जातांना कच्च्या रस्त्यातून तळ्यातल्या गणपतीला वळसा घालून जावं लागत असे. ह्या गणपतीची स्थापना नानासाहेब पेशव्यांनी केली.

**१८) पासोड्या विठोबा व पासोड्या मारुती –** ही मंदिरे बुधवार पेठ व रविवार पेठ यांच्या सीमेवर, बुधवार चौकातून मोती चौकाकडे जाण्याच्या मार्गावर रस्त्याच्या मध्येच आहेत. या मंदिरांभोवती साड्या-लुगडी-खण इत्यादी लग्न समारंभासाठी लागणाऱ्या वस्तुंची (स्थानिक भाषेत याला पासोडे म्हणतात) दुकाने आहेत.

**१९) छिनाल बालाजी –** हे मंदिर जोगेश्वरी मंदिरापासून बुधवार चौकाकडे जायला लागलं की २५-३० पावलांवर उजवीकडे आहे. पूर्वी या मंदिराचे आसपास वेश्यांची बरीच घरे होती. व संध्याकाळी या मंदिराच्या आसपास रस्त्यावर उभ्या असत. त्यामुळे मध्यम वर्गीय कुटुंबवत्सल माणसे या बाजूला संध्याकाळी फिरकत नसत. त्यामुळे या मंदिराला छिनाल बालाजी असे नाव पडले.

**२०) दाढीवाला दत्त –** हे मंदिर नारायण पेठेतील लोखंडे तालीम पासून ते लक्ष्मीरोडकडे जातांनाच्या रस्त्यावर, कुंटे चौकाच्या अलिकडेच उजव्या हाताला आहे. हे मंदीर ज्यांच्या मालकीच्या वाड्यात होते त्या वाड्याच्या मालकाला मोठी दाढी होती. म्हणून याचे नाव 'दाढीवाल्यांचा' दत्त. कालांतराने पुढे त्याचे नाव 'दाढीवाला' दत्त पडले. प्रत्यक्षात दत्ताला दाढी नसते.

**२१) बिजवऱ्या विष्णु –** हे मंदिर वर वर्णन केलेल्या 'वीराच्या मारुती' मंदिरासमोर शनिवार पेठेत आहे. या विचित्र नावाची कूळकथा गम्मतशीर आहे. या मंदिरात विष्णु-लक्ष्मी यांच्या मूर्ती आहेत. काही कारणाने काही वर्षापूर्वी लक्ष्मीची मूर्ती भंग पावली. नंतर त्या ठिकाणी योग्य मुहूर्तावर लक्ष्मीच्या नवीन मूर्तीची रीतसर प्रतिष्ठापना करण्यात आली. पण कालांतराने या मंदिराला 'बिजवऱ्या' विष्णुचे मंदिर असे संबोधू लागले. बिचाऱ्या भगवान विष्णुला लोकांनी 'बिजवऱ्या' (त्या देवळापुरते) करून टाकले. आहे की नाही गंमत !

**२२) प्रेमळ विठोबा –** हे मंदिर शनिवार पेठेत, मेहुणपुऱ्याजवळील राजमाचीकरांच्या पिठाच्या गिरणीसमोरील वाड्यात आहे. वास्तविक सर्वच देव हे प्रेमळ, दयाळू असतात. मग याच विठोबाला प्रेमळ का म्हणतात हे कोडे काही उलगडले नाही.

एकंदरीतच माणूस दुसऱ्याला नावे ठेवण्यास मागे-पुढे पाहत नाही. पण देवाचीसुद्धा यातून सुटका झाली नाही एवढे मात्र खरे.


(टीप : जिज्ञासूंनी कांही मंदिरांची तसेच चर्चेस्/अग्यारी/ज्यूंचे लाल देऊळ इत्यादींची माहिती घेण्यासाठी व प्रत्यक्ष फोटो पाहण्यासाठी -

**http://www.virasatpune.com/beta/category/heritage/places/places-of-worship/**... ही लिंक 'ब्राऊजरमधे' मधे टाईप करून या वेबसाइटला भेट द्यावी. तसेच श्री.वि.ना.नातूंचे 'आधीच पुणे गुलजार' हे पुस्तक वाचावे)

**- रा.ना.लळिंगकर, पुणे.**
(M) 09822107988

ललित

## चरबीदान



मी अशोक, वय वर्षे ६५. सकाळी थोडेसे फिरून आलो व सोफ्यावर धपकन् बसलो. छातीत थोडे दुखल्यासारखे होत होतं, तेवढ्यात अर्धांगिनीने ''चहा घेणार का?'' म्हणून विचारले. ''नको ग, आज छातीत थोडं दुखत आहे. डॉ. फडके यांचेकडे जावं का, याचा विचार करतो आहे. गॅसेसमुळे दुखत असेल.'' ''गेल्या आठवड्यात, तुमच्या नाही नाही म्हणता ३ पार्ट्या झाल्या. प्रत्येक ठिकाणी खाणं अन् पिणं. डॉ.नी गेल्या महिन्यातच सांगितले की वजन कमी करा! वजन आणि चरबी वाढविणारे पदार्थ खाऊ नका, पण ऐकतो कोण? अहो ८० किलो वजनात १०० ग्रॅमही तुम्ही कमी करायला तयार नाही! बरं व्यायामाची बोंब! पायी फिरायला जाता, पण फिरण्यापेक्षा मित्रांमध्ये चकाट्या पिटण्यातच तुमचा वेळ जात असतो. सकाळी ३० ते ४० मिनिटं तुम्हाला जलद चालण्याचा सल्ला दिलेला आहे! पाळता का तुम्ही? तरी मी घरात तुमच्या खाण्यावर नियंत्रण ठेवते म्हणून बरं! पण बाहेर तुम्ही काय काय नको ते पदार्थ हादडत असता कोण जाणे! तुम्हाला वाटत असेल तर जाऊ या डॉ.कडे.'' तिच्या तोफखान्याला तोंड देणे शक्य नव्हते. मग मुकाट पेपर डोळ्यांसमोर धरून बसलो.

मी मनात विचार केला, सालं हे नियमीत व्यायाम करणं आणि चालणं काही जमत नाही व जिभेवर नियंत्रण ठेवणंही कठीण आहे. जगात एवढे चांगले चांगले चविष्ट पदार्थ, परमेश्वरानं, सुगरण बायकांनी, हॉटेल-रेस्टारंटमधील बल्लवचार्यांनी शोधून तयार केले आहेत, की त्याचा मोह टाळता येत नाही.

मरण तर अटळ आहे. या जगात ढोबळ मानाने दोन पद्धतीने लोक मरतात. एक अन्न मिळत नाही म्हणून उपाशी राहून व दुसरे भरपूर खाऊन खाऊन! आपलं मरण खाऊन खाऊन धावून येणार असं वाटतं!

पण वजन कमी करायला हवं हे नक्की! अंगावर चरबी खूपच चढली आहे. ती कमी व्हायलाच हवी. पण काय करावे? कळत नाही. कळतं पण वळत नाही हेही खरे!

दुपारी १॥ ला मस्त मसालेभात, पुरी, भाजी व हलदीरामचे गुलाबजाम चापले व आता तासभर वामकुक्षी घ्यावी म्हणून वर्तमानपत्र तोंडासमोर धरून बेडवर आडवा झालो. महत्त्वाच्या ठळक बातम्या मी सकाळीच वाचतो व दुपारच्या झोपेपूर्वी संपादकीय, समिक्षा, पुस्तक परीक्षण, लेख इ. वाचन करण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे होतं काय की हे वाचन डोक्यावरून जायला लागते व छान झोपेची गुंगी यायला सुरुवात होते. मस्त झोप लागते, पेपर हातामधून केव्हा गळून पडतो ते कळत नाही. मग ३॥ ला हिची पहिली आरोळी येते. दोन मिनिटांनी पुन्हा दुसरी आरोळी व टी.व्ही.चा आवाज येऊ लागतो मग उठावेच लागते. चहा तयारच असतो. ३॥ ला सुरू होणाऱ्या टी.व्ही. सिरियल्स तिला बघाव्याच लागतात. म्हणून मलाही उठावेच लागते. चहा तयार करण्याच्या कर्तव्यातून तिला मुक्त व्हायचे असते. गेल्या कित्येक वर्षांपासून आमचा हा दिनक्रम सुरू आहे.

पण आजच्या पेपरमध्ये आपले आरोग्य या सदराखाली एक छोटा लेख वाचण्यात आला, भारतीय मूळ असलेल्या अमेरिकेतील कुणा बेंद्रे नावाच्या डॉक्टरांनी पाच वर्षे संशोधन करून एक मेडिकल पद्धत शोधून काढली. त्यानुसार मानवी शरीरात अतिरिक्त झालेली चरबी काढून ती काही विशिष्ट दिवसापर्यंत साठवून ठेवून, चरबीची आवश्यकता असलेल्यांना म्हणजे ज्यांना आपण बारीकराव, काडी पहेलवान म्हणतो किंवा कितीही खायला घातले तरी हाडे मोजता येतील, किंवा एखाद्या मोठ्या आजारामुळे अशक्त व कृष झालेली व्यक्ती. अशांना एका विशिष्ट यंत्राद्वारे रक्तदान करतात त्या पद्धतीने चरबीदान करता येणे शक्य होणार आहे.

चरबीदानासाठी काही तंत्रं पाळावी लागतील. म्हणजे त्यासाठी अगोदर एक टेस्ट करावी लागेल. पत्रिकेत जसे ३६ गुण जमावे लागतात किंवा रक्तदान करताना जसे रक्तगट जमावे लागतात तसे. चरबीचे गट तयार करून ती मॅच करावी लागेल, १०० पैकी ७० गुण तरी मॅच झाले तरी चरबी देता/घेता येईल. महिन्यातून एक वेळ २ किलो चरबी देता/घेता येईल.

मला हे संशोधन वाचून अत्यंत आनंद झाला. दर महिन्याला दोन किलो ह्या हिशेबाने चरबीदान केले तर ५/६ महिन्यात आपण आपले ७० किलोचे डॉ.नी सांगितलेले टार्गेट पूर्ण करू शकू. मुख्य म्हणजे दान केल्याचे पुण्य अनायासे पदरात पडत जाईल. त्यामुळे स्वर्गातील जागा ही पक्की होऊन जाईल. सौ.ची कटकट कमी होईल. शिवाय खाण्यापिण्याचे बंधन कमी झाल्याने, निरनिराळ्या पदार्थांचा मनसोक्त आस्वाद घेता येईल. असा विचार करता करता माझा डोळा लागला. मनी वसे ते स्वप्नी दिसे या उक्तीप्रमाणे दृष्य स्वप्नात येऊ लागली.

मी चरबीदान करण्यासाठी डॉ.कडे नाव नोंदविले. त्यांनी माझा चरबीगट तपासून तसे एक कार्ड मला दिले. डॉ.कडे चरबीदान देणारे/घेणारे अशी वेटिंग लिस्ट तयार होऊ लागली. ज्यांना चरबी हवी आहे, त्यांनी आपला दाता शोधावा व चरबीगट निश्चित करून डॉ.ची. तारीख घ्यायची. ब्लड बँकसारखी चरबी बँकही अस्तित्वात आली. रक्ताच्या पिशव्यासारखे चरबीचे लहान मोठ्या आकाराचे केक/ब्रेडसारखी पॅकेट्स तयार झाली. ती ठेवण्यासाठी शीतगृहे हॉस्पिटलमध्ये तयार झाली. चरबी दान देणारे/घेणारे यांचेसाठी

काय काय काळजी घ्यावी, कोणती पथ्ये पाळावी याची सूचना पत्रकं डॉ.नी छापून घेतली.

साधारण एक किलो चरबी दान देण्या/घेण्यासाठी २ तास लागणार होते. त्या दृष्टीने हॉस्पिटलमध्ये विशिष्ठ रूम बुक करणे, नंतर चरबी दान प्री आणि पोस्टसाठी वेगळी रूम, डॉ.ची फी, चरबी गटाप्रमाणे तीचे रेट ठरू लागले. रक्तदान शिबीरासारखी चरबीदान शिबीरं-सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांनी, राजकीय कार्यकर्त्यांनी सुरू केली. आपल्या नवीन प्रधान सेवकांनी सर्व चरबीयुक्त मंत्री खासदार, आमदार, पक्ष पदाधिकारी यांना महिन्यातून गरीबांना एक वेळ १ किलो चरबीदान करावी व तसा एक रिपोर्ट ऑफीसला पाठवावा, असे फर्मान काढले. पूर्वी सत्तेवर असलेल्या व आता सत्ताहीन झालेल्या पक्षाच्या नेत्यांची चरबी आपोआप उतरू लागली असे आढळून आले. काही सामाजिक संस्थांनी राजकारण्याची चरबी दान घेऊ नये, कारण ती भ्रष्टाचारामुळे जमा झालेली आहे, असे जनतेला आवाहन केले. अशी चरबी घेणे म्हणजे देशद्रोहच होईल. काही निव्वळ शाकाहार घेणाऱ्या समाजाने मांसाहार करणाऱ्यांची चरबी घेऊ नये असे त्यांच्या समाजाला प्रवचनातून सांगितले. काही कडव्या हिंदु संघटनांनी मुस्लिम समाजातील व्यक्तिची चरबी घेऊ नये असे कीर्तनातून प्रबोधन केले, तर मुस्लीम समाजाने हिंदूंना चरबी देऊ नये व त्याचीही घेऊ नये असे फतवे काढले. त्यामुळे उलटसुलट व चुकीचे मतप्रवाह सुरू झाले.

सर्वधर्मसमभाववाल्यांनी कोणीही कुणाचीही चरबी निषिद्ध मानू नये असा प्रचार सुरू केला. जसं सर्व मानवजातीचं रक्त एकच आहे, तशी चरबी देखील सर्व जातीधर्माच्या लोकांची एकच आहे. त्यामुळे जातीधर्माच्या आधारे चरबीदानाची चळवळ थांबवू नये असे आवाहन केले.

''लहू का रंग एक है
अमीर क्या गरीब क्या...''
ह्या चालीवर,
चरबी सबकी एक है
हिंदु क्या मुस्लिम क्या ।।
गरीब हो या अमीर
हिंदु हो या मुस्लिम
सबकी चरबी एक है ।।
चरबी दान पुण्यका काम
चरबी दो, चरबी लो
सबका वेट बराबर करलो ।।
चरबी घटानेवाले
खाओ पिओ मजा करो
चरबी लेनेवाले, खुश रहो ।।

दारावरची बेल वाजल्याने जाग आली. माझी मेहुणी आली होती. आल्या आल्या तिने सौ.च्या हातात एक पुडके दिले. ''अग ताई जीजूसाठी येताना शर्मा-स्वीटमधून गरम गरम समोसे आणले आहेत, चहाबरोबर दे त्यांना! त्यांना आवडतात म्हणून आठवणीने घेऊन आले.''

आजच अर्धा किलो चरबी नक्की वाढणार असा विचार करून अंथरूण सोडले व चहा-समोसेवर ताव मारण्यासाठी तयार झालो. डॉ. बेंद्रे यांनी लवकर भारतात यावे किंवा त्यांचे संशोधन पाठवावे अशी मनात प्रार्थना केली.

**२५/१५** **वसंत धुपकर, पुणे**
**मो. ८९७५२१८०४९**

# जोगवा

अधिक मागणे नाही देवा, नाही मज हव्यास
केवळ तुझिया कृपे मिळो, दोन सुखाचे घास ।।धृ.।।

मल्लाची मज शक्ति नको, नको देह पिळदार
नको देखणे रूप सुंदर, नको छाती भरदार
निरोगी काया-निरोगी मानस ही ऐश्वर्याची रास!

नकोत गाड्या, नको बंगला, नको शाल उबदार
डोईवरती छाया दे अन् साथी दे दिलदार
जिवलगांच्या संगे होईल स्वर्ग-सुखाचा भास!

नको गर्वाची अति उंची, नको लाचारीची दरी
अंधाराची नको काजळी, नको प्रकाशाच्या सरी
'तव चरणी लीन राहणे' हाच राहू दे ध्यास!
मज हातांना काम मिळो, घामास मिळू दे दाम

अश्रु पुसता दीन जनांचे, त्यातच दिसू दे राम
सफलतेतही नको सुटाया, मम प्रयत्नांची कास!
नको अहंतेचा खळखळ झरा ना अपकीर्तीचा वारा

उजव्या हस्ते दान दिलेले, नको कळाया वाम करा
कर्तृत्वाच्या फुलात भरू द्या यश-कीर्तीचा सुवास!

**गोविंद करमरकर,**
**४/१५** **मो. ८८०५९५९८२४**

लघुकथा

# अखेर जमलं हं !



रघु आता वयात आला होता. आईवडील गेल्यापासून तो मावशीकडेच वाढला होता. मावशीला सर्व प्रयत्न म्हणजे डॉक्टर तपासणी, उपवास, देवधर्म, अभिषेक करूनसुद्धा मूल नव्हते. त्यामुळे रघुवर तिचा भारी जीव. त्याला नोकरी होती, पण पगार फार नव्हता. रघु आता वयात आल्यावर मावशी जरा बैचैन होती, न जाणो, रघु लग्न झाल्यावर वेगळा राहिला तर आपले कसे होणार?

गावातील काही उपद्व्यापी मंडळींनी त्याच्या स्थळाविषयी वर संशोधन मंडळात रजिस्टरमध्ये नोंद केली होती. ती कोणी केली हे रघुला शेवटपर्यंत कळले नाही. बेट्याला लग्न करावे असे मनातून भारी वाटे. किंबहुना लग्नाचा विचार मनात आल्यावर निरनिराळी स्वप्ने पाहात तो फुलून जाई. पण लग्न करायचे हे मावशीजवळ कसे सांगायचे? गावातील लोकांना आणि मित्रांनाच तो मावशीजवळ विषय काढा म्हणून सांगायचा. त्याप्रमाणे लोक मधून मधून घरी येऊन चौकशी करून जात. मावशीचे यजमान कशातच भाग घेत नसत. त्यांची प्रकृत्ती बरी नसे. आज तरी मावशी आपल्याला लग्नाविषयी काहीतरी विचारील अशा आशेनेच त्याचा दिवस उगवायचा आणि वांझ जायचा. लग्नाविषयी ती कधीच त्याच्याजवळ बोलत नसे. त्यामुळे मावशीवर तो मनातून चिडायचा, पण लहानपणापासून तिने वाढविल्यामुळे तो आपला राग मनात ठेवे.

''काय गं मावशी, सध्या आपल्याकडे लोकांची जरा वर्दळ वाढलेली दिसते.'' रघूने जरा धाडस करून विचारले.

''अरे, तुझ्या स्थळासाठी येताहेत मुली.''

(रघु मनातून बहरतो.)

''मग पुढे.''

''पत्रिका तर जमली पाहिजे ना? त्याशिवाय कशी मुलगी पहायची?''

पत्रिका जमत नाही या कारणास्तव मावशींनी सर्व वधुपित्यांना वाटेला लावले होते. रघु आपला नेहमी ताटाखालीच रहावा असे त्यांना वाटे. एक दोन वर्षे अशीच गेली. रघुच्या लग्नाचा योग काही येईना आणि त्याला चैन पडेना. हे असे किती दिवस चालायचे?

त्याने ज्योतिषाला हात दाखवला. योग आहे पण बराच अवधी लागेल, या त्याच्या भविष्यावर रघु चांगलाच हादरला. शेवटी वैतागून आपणच आपल्या लग्नाचा प्रयत्न करायचा असे त्याने ठरवले. त्याप्रमाणे त्याने प्रयत्नही केले. काही मुली पाहिल्या पण त्याला पसंत पडल्या नाहीत. कोणी थोराड तर काही काळ्या. ज्या थोड्या बऱ्यापैकी होत्या त्यांनी रघुला नकार दिला. वर्तमानातील छोट्या जाहिरातीतील वधुंच्या पत्यावर जाऊन त्याने प्रयत्न केले. परंतु तेही असफल. त्याला काही सुचेना. बिचारा बेचैन झाला. ऑफीसमध्येही त्याचे नीट लक्ष लागेना.

एके दिवशी सहज वर्तमानपत्र वाचताना खालील नोटीस त्याच्या वाचनात आली.

> आमचे अशील शंकर बालाजी धनपुरे यांच्या सांगण्यावरून सौ. पार्वती शंकर धनपुरे राहणार ..... हिस जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, तीन महिन्यांपूर्वी तुम्ही बाळंतपणासाठी माहेरी गेलात. बाळंत झाला की नाही हे काहीच कळवले नाही. पत्रही पाठवले नाही. जाताना घरात कुणालाही सांगितले नाही. तरी या नोटीसीद्वारे आपणास असे कळवण्यात येते की, या नोटीसीच्या तारखेपासून आठ दिवसात जर सासरी नांदण्यास आला नाहीत तर आपला आणि आमचे अशील यांचा असलेला नवराबायकोचा संबंध संपुष्टात आला असे समजून आमचे अशील दुसरा घरोबा करण्यास मोकळे होतील व आपणही दुसरा घरोबा करण्यास मोकळ्या व्हाल.
>
> ॲडव्होकेट

रघुने हाही पार्वतीचा पत्ता काढला.

''काय आहेत का बाई घरात?''

''कोण आहे?''

''मी रघुनाथ, पेपरातील नोटीस वाचली.'' त्याने लग्नाचा विषय काढला.

''तुमचा आमचा काय संबंध? हा आमचा घरचा मामला आहे. तुम्ही कशाला मधे पडता? तुम्ही इथे आलातच कसे? जाता की काढू चप्पल?''

तिचा हा अवतार पाहून रघु घामाघूम झाला. मार खायचीच पाळी आली होती, पण सुटला. रस्त्यातून घाईनेच चालत होता.

''अहो, साहेब?''

रघुने सहज मागे वळून पाहिले.

''हो, तुम्हीच.''

''मी?''

''हो, तुम्हालाच बोलावतोय.''

एका घराच्या बाहेर दोन पोलिस उभे होते. त्यातल्या एका पोलिसाने रघुस हाक मारली होती. घराबाहेर ५-६ माणसं उभी होती.

''काय? मला हाक मारलीत?''

''होय हो! तुम्हालाच बोलावलं. पंच म्हणून काम करावं लागेल.''

''अहो, पण मला क्रिकेटमधलं काही कळत नाही. तुम्ही दुसरा पंच बघा ना?''

''हे पहा जास्त बडबड करू नका. सरकारी कामात अडथळा आणला म्हणून खटला भरू आम्ही. मुकाट्याने आम्ही काय सांगतो ते ऐका. ह्या बाई. ह्या इसमाने बाईंचा पाळणा लांबवला अशी बाईंची तक्रार आहे.''

''मग, माझा काय संबंध? अहो, माझे अजून लग्न झालेले नाही. इथं काय नसबंदी शिबिर चालू नाही ना? त्या माणसाने पाळणा लांबवला असेल तर सरकारच्या आदेशाप्रमाणेच त्याने केले. त्याचा सत्कार करा. चौकाचौकात फ्लेक्स लावा. मंत्र्यांच्या हस्ते त्याला चांगलं बक्षिस द्या.''

''तुम्हाला एकदा सांगितलं ना बडबड नको म्हणून? तर आम्ही काय म्हणत होतो - या बाईंचा पाळणा या माणसाने लांबवला म्हणजे चोरला. त्याच्या घराची आता झडती घ्यावयाची आहे. तुम्ही सरकारी पंच म्हणून काम करायचं. झडती घेतल्यावर पंचनामा होईल. त्यावर सही करायची.''

''अहो, मी ब्रह्मचारी, शनिवार म्हणून मारूतीला निघालो होतो आणि लग्नाच्या आधीच या पाळण्याच्या भानगडीत कशाला गोवता? तुम्ही दुसरा एखादा लग्न झालेला पंच का नाही बघत?''

रघु पुन्हा पुन्हा पोलिसांची विनवणी करत होता. पण त्यांनी त्याचे ऐकले नाही. दोन एक तासानंतर त्याची सुटका झाला. आता कोर्ट.... साक्ष.... नसतं लचांड - करायला गेलो एक.

एकूण या सर्व अनुभवावरून आता लग्नाच्या फंदात पडायचं नाही असा विचार त्याच्या मनात डोकावला गेला आणि याच वेदनेतून एक नवीनच कल्पना त्याला सुचली. बस् आता समाजकार्य. जे आपल्याला मिळत नाही ते लोकांना मिळवून द्यायचं. समाजकल्याण. आपलं जमत नाही तर निदान लोकांच्या मुला मुलींचे लग्न तरी जमवून देऊ, लोकांचे आशिर्वाद घेऊ. त्याने वधुवर सुचक मंडळ काढायचे ठरविले. त्यासाठी नोकरी सोडायचा त्याने निश्चय केला. मित्रांच्या मदतीने त्याने जागा बघीतली. बँकेकडून कर्ज मिळवले आणि रघुच्या 'वधुवरसुचक' मंडळाच्या ऑफीसचे शानदार उद्घाटन झाले. मावशीचे आशीर्वाद पाठीशी होतेच. जाहिरातही त्याने आकर्षक रितीने केली होती.

बँका, इन्शुरन्स कंपन्या, खाजगी कंपन्यात जाऊन त्याने लग्न-कर्तव्य असलेल्या मुलामुलींची यादी केली. त्यांची सर्व माहिती मिळवली. त्याचे नशिब थोर. हळूहळू त्याच्याकडे वधु-वर पित्यांची वर्दळ वाढू लागली. पैसाही बऱ्यापैकी मिळत होता. बाहेरील कामासाठी त्याने आता असिस्टंट ठेवला. तोही बाहेरची कामे व्यवस्थित करी. लोकांच्या सोयीसाठी रेल्वेरिझर्व्हेशनसारखा बोर्ड लावला गेला. एकूण स्थळे - लग्न जमलेली स्थळे- एकूण शिल्लक स्थळे ..... चार/पाच आकडी पगाराची स्थळे लवकर जात म्हणजे त्यांची लग्ने लवकर जमत. तरी पुन्हा पुन्हा लोक चौकशी करत.

''अहो! मी आताच आपणास सांगितले. मोठ्या पगाराची ग्रॅज्यूएट स्थळे बहुतेकांची लग्ने जमली. नवीन स्थळे आल्यावर आपणास कळविनच. त्यावेळी जरूर भेटा.''

''पण एक विचारू का?'' वधुपिता.

''हो! अवश्य!''

''सिनेमा थिएटरमध्ये काही तिकीटे अगोदरच काढून ठेवतात, नाटकाला तिकीटविक्रीच्या पहिल्याच दिवशी लवकर गेलं तरी पुढच्या रांगेतील तिकीटे संपलेली असतात, काही जागा राखीव ठेवतात, तशी तुमच्याकडे राखीव स्थळे असतील तर सांगा. थोडे डोनेशन हवे तर घ्या....''

''अहो, तसे काही नाही, येथे सर्वधर्मसमभाव आहे. आपण दोन चार दिवसांनी चौकशी करा. ''

रघु आता चांगलाच फार्मात आला होता. आतापर्यंत बरीच लग्ने त्याने दिलेल्या स्थळांवर जमली होती. लोकांचा एक प्रकारे त्याने विश्वास संपादन केला होता.

एक दिवस रघुच्या अचानक ऑफीसशेजारील बिल्डींगवर मोठी पाटी झळकली - 'येत आहोत आपकी सेवामें..... ' रघुला वाटले, कोणी मारवाडी कापड दुकान किंवा सुपरमार्केट काढणार. पण त्याचा हा अंदाज साफ चुकला आणि एका आठवड्यातच तेथे नवीन वधुवरसुचक मंडळाचे ऑफीस उघडले. संचालिका - मधुमती खांडेकर. रघू जरा काळजीत पडला. नाही म्हणले तरी आता स्पर्धा आली.

'भरपूर स्थळे, वधु आणि वर. त्वरा करा नाहीतर पस्तावाल.' स्थळे थोडी. पण खात्रीशीर. एकदा खात्री करा. पलिकडला बोर्ड.''

''आमचेकडे आफ्टर मॅरेज सर्व्हिस, लग्नानंतर मधुचंद्रासाठी हॉटेल बुकींग, सुतिकागृह, बालकमंदिर यांचेही अगोदरच रिझर्व्हेशन.'' रघुचा बोर्ड.

आमच्या स्थळांची कायमची गॅरंटी. आफ्टर मॅरेज सर्व्हिसची जरूरी नाही. पलिकडला बोर्ड.

या अशा जीवघेण्या स्पर्धेमुळे रघु चांगलाच चक्रावला. नाही म्हणले तरी त्याच्या धंद्यावर तसा परिणाम होऊ लागला. तो बेचैन झाला. ही बाई भलतीच हुशार दिसते. माझ्याशी सामना करते काय?

त्याने दुसरी शक्कल काढली. आपल्या असिस्टंटला बोलावले.

''हे पहा अनिल, तु जाणतोच आहेस, शेजारी आपल्याला जोरदार स्पर्धक आला आहे, त्याला तोंड देण्यासाठी मी एक योजना आखली आहे.

''काय ठरवले आहे तुम्ही?''

''तु त्या शेजारील बाईकडे नोकरीसाठी जायचं. तुझे आणि माझे पगारवाढीवरून मतभेद झाले असे तिला सांगायचे. तुला येथील कामाचा अनुभव आहेच.''

''पण ती मला नोकरीवर घेईल याची गॅरंटी काय?''

''ती काळजी तू करू नको, अरे हे नाटक आहे. येथील पगार तुला चालू राहणार आहेच. येथील अनुभवामुळे तुला ती जरूर कामाला घेईल. तु फक्त एवढंच काम करायचं की ती बाई कुठुन स्थळे मिळवते? तिच्याकडे कोण कोण येते? तिचे कुठे कुठे कॉन्टॅक्टस् आहेत? ही सर्व माहिती मला गुप्तपणे पुरवायची, मग बघतो तिच्याकडे. माझ्याशी स्पर्धा करते काय? अरे घी देखा बडगा नही देखा. अर्थात् यात माझी थोडी अडचण होणार आहे, हे मी जाणतोच. बट आय वील मॅनेज. ऑल द बेस्ट.'' एखाद्या मोठ्या ऑफीसरच्या थाटात तो सांगत होता.

रघुचे भविष्य खरे ठरले. अनीलला खरोखरच त्या बाईने कामावर घेतले. ठरल्याप्रमाणे रघुला तो व्यवस्थित बातम्या पुरवू लागला.

अनील गेल्यावर रघुवर खरोखरीच कामाचा ताण पडू लागला. ऑफिसमधील व बाहेरची कामे यासाठी त्याला जास्त वेळ द्यावा लागत असे. हाताशी एखादा दुसरा असिस्टंट नेमायच्या विचारात तो होता.

''रघुनाथ मांडके आपणच का?''

''होय. का?''

''मी नोकरीच्या निमित्ताने आले होते चौकशीला.''

''आपल्याकडे जागा आहे का? पार्टटाईम नोकरी असेल तरी चालेल.''

''आपलं नाव?''

''शोभना, शोभना बर्वे''

''पण क्लार्कम्हणून एखाद्या बँकेत किंवा सरकारी ऑफिसमध्ये नोकरी करण्यापेक्षा ही लाईन आपण कशी निवडली?''

''हातावरील रेषा पाहून मला ज्योतिषाने सांगितले होते की मी या लाईनीतच नोकरी करणार. '' या तिच्या वाक्यावर दोघेही मनापासून हसले.

''येथे भरपूर काम असते. वेळेवर यावे लागते. बँक किंवा सरकारी ऑफिससारखे नाही.''

''माझी तयारी आहे.''

''मग या उद्यापासून कामावर.''

शोभना कामावर येऊन चार दिवस झाले. स्पर्धा जोरात चालू होती. रघु आता जास्त काळजी करू लागला.

एकेदिवशी अचानकती संचालिका रघुच्या ऑफिसमध्ये आली. शोभनाने तिला रघुकडे पाठविले.

''मी आत येऊ शकते का?''

''या की, या बसा.''

''मी मधुमती खांडेकर. संचालिका - एकरूप वधुवरसुचक मंडळ.''

''ओ आय सी.'' रघुची आणि तिची आजच समोरासमोर मुलाखत होत होती.

''आपण काय घेणार? चहा, कॉफि की थंड?''

''नो थँक्स्.''

''आज इकडे कसे अचानक येणे केले?''

''मला जरा अर्जंट ५/६ ग्रज्युएट, मोठ्या पगाराची स्थळे हवीत. माझी नवी यादी येईलच. ती आली की मीही काही चांगली स्थळे आपणांस देईन. अहो! मारवाडी नाही का असा एकमेकांत व्यवहार करीत? तसंच आपण करायला काय हरकत आहे? शेजारधर्म नको का पाळायला?''

''छान छान, मस्त आयडीया आहे हं!''

''अरे खरेच, मी गडबडीत माझी ओळख करून देण्याचे विसरलोच मी...''

''रघुनाथ मांडके, मला सगळं माहित आहे. तुम्हाला मावशीने लहानाचे मोठे केले. बरीच वर्षे लग्न जमले नाही म्हणून या लाईनीत पडलात, नोकरीवर लाथ मारून.''

''म्हणजे? अहो, हे सर्व तुम्हाला....''

''मला शोभना, सध्याची तुमची असिस्टंट, हिने सर्व माहिती दिली आहे. मीच तिला मुद्दाम तुमच्याकडेपाठवली होती. चल शोभना, आता निघायचे ना?''

''अहो, पण तुम्हाला स्थळे हवी होती ना?''

''अहो, नाही ते एक निमित्त होतं. मीही तुमच्यासारखीच परिस्थितीमुळे या लाईनीत पडले. माझेही अजून लग्न झालेले नाही.''

''म्हणजे आपण दोघे एकाच कंपार्टमेंटमध्ये.''

''बरोबर ओळखलं. आता लाईन क्रॉस करायला हरकत नाही, माझी तयारी आहे.''

''पण माझी पत्रिका न पाहताच तुम्ही....''

''इश्श..... तुम्हाला समोर बघीतल्यावर पत्रिका ती काय पहायची?''

सुयोग्य मुहूर्तावर रघुनाथ आणि मधुमती यांचा मंगलविवाह पार पडला. दोन वधुवर मंडळांचे विलीनीकरण झाले. दोन जीवांचे मीलन झाले. दोघेही मावशींच्या पाया पडले. मावशींच्या आग्रहास्तव सुनबाईंना नाव घेणे भाग पडले.

''केसात खोवला मोगऱ्याचा गजरा, अन् त्यावर चाफ्याची फुले,
फुले बघून रघुनाथरावांची कळी कशी शानदार खुले.''

मावशींनी दोघांना आशीर्वाद दिला.... ''रघुबेटा, अखेर जमलं हं!''

**प्रभाकर गुपचूप, पुणे**
मो. ९८८१५७९४९९

## घुमानची वारी - साहित्याची वारी

मी लेखकही नाही, अन् कवीही नाही
मी आहे एक छोटीशी साहित्याची वही
खिशात बसून लेखकाच्या आणि कवीच्याही
साहित्य संमेलनाच्या घुमानी वारी करूनी आले ||१||
माझ्या कायेभोवती लेखकाने मायेचे कुंपण घातले
कवीने तर माझ्या हृदयात प्रेमाचे अंकुर रुजवले
पण दोघांच्या कलहात माझे जगणे मुश्कील होऊन बसले
मनपसंत नाही लिहिले तेव्हा बोळा करूनी भिरकावले
मी वारी करूनी आले ||२||
साहित्याचा पसारा आणि मंडपाची भव्यता पाहुनी मन चक्रावले,
त्यात मला या दोघांनी प्रेमाने वा भीतीने चक्क सुरळी करून नेले,
कंठशोष झाला, काया आकसली, मन विषण्ण, थिजून गेले,
लेखकाच्या अन् कवीच्या खिशात मी निपचित पडून राहिले
मी वारी करूनी आले ||३||
शेवटी लेखकाने मला कवेत घेऊन हळुवार छान छान गोंजारले,
कवीने तर माझ्या शुष्क अधराशी प्रेमान वारंवार चुंबिले
असा काय चमत्कार झाला कि माझे वदन सुखावले
कवीच्या अन् लेखकाच्या गळ्यात पद्मश्रीचे पदक मात्र चकाकले,
मी वारी करूनी आले ||४||

**श्री. अरुण अनंत काकडे, पुणे.**
**२७/१५ मो. ९४०३७६४७७८.**

## कैफियत

जे सांगताही येत नाही
सहनही होत नाही
या मनातील भावना
असह्य होतात यातना
तारेवरची कसरत
वाटू लागते हे जगणं
क्षणोक्षणी मरण अन्
क्षणोक्षणी हरणं
आशा असेल मनात तर
सर्वांवर मात करता येते
या कलीयुगात असे काही घडेल का?
निराधाराला आधार
अन्यायाला न्याय
अपराध्याला शिक्षा
निरपराध्याला क्षमा मिळेल का?
या प्रश्नांची उत्तरे मिळतच नाहीत
जीवनाची कैफीयत संपतच नाही,
संपतच नाही.

**सौ. संध्या प्रितम परदेशी, औरंगाबाद**
**६८/१५ मो. ९३२५२१८१२५**

## माझ्याच भावकोषी

माझ्याच भावकोषी
मी दडून राहिले
तेजात रंगले नभ
मी नाही पाहिले ||धृ||
ये दुरून हाक कानी
घाली निसर्ग साद
माझ्या मनी उमटती
माझेच हे प्रतिसाद
सुख बोलावीत आले
मी नाही ऐकिले ||१||
लज्जेत मन मिटे हे
की पर्णकोषी कमल
हे आवरण कशाचे
अवचित येई तरल
केले किती प्रयत्न
परि तंतू नाही तुटले ||२||
कुणी अंतरात जागे
मजला न काही कळले
हलकेच पापणीला
स्पर्शून कोण गेले
तो स्पर्श संजीवनीचा
नाही मला उमगले ||३||
अचानक परंतु ते
कोष गळून पडले
चैतन्य देही भरूनी
मनपाखरू उडाले
विसरून पार गेले
एकांत राहिलेले ||४||

**४७/१५ सौ. उज्वल ब्रम्हांडकर, विरार (पूर्व)**

## विनोद

गिऱ्हाईक - (वाढप्यास) काय रे, तुझ्याबरोबर वाढणारा वाढपी दिसत नाही रे?

वाढपी - येथील रोज जेवण करून त्याला जबरदस्त पोटदुखी झाली. म्हणून त्याने ही खानावळ सोडली. आता तो दुसऱ्या खानावळीत कामाला आहे.

**प्रभाकर गुपचूप, पुणे.**

ललित

# छंद माझा आगळा !

मला प्रवास करायला फार आवडतं, अगदी एस.टी.च्या लाल डब्यातून सुद्धा! पहिल्या/दुसऱ्या ओळीत जागा मिळाली तर उत्तम, पण कधी ड्रायव्हरच्या केबीनमधली फ्रंट सीट मिळाली तर दुधात साखर! पुढं बसण्यानं सभोवतालचं सर्व जग आपल्यासाठी खुलं असतंच पण आणखी काही गोष्टीसुद्धा मनाला भुरळ घालतात. रात्रीची वेळ असेल तर वाहनांच्या दिव्यांचा डोळे मिचकावण्याचा खेळ आपणाला मोहित करतो तर दिवसा ट्रकच्या पाठीवर जी वाक्यं लिहीलेली असतात ती वाचून छान करमणुक होते. धावत्या प्रवासात पुस्तक वाचू नये असे म्हणतात पण ट्रकच्या मागील बाजूस लिहीलेले संदेश तुम्ही खुशाल वाचू शकता, अगदी मनोरंजनासकट!

'मेरा भारत महान', 'सुरक्षित अंतर ठेवा', 'माउलीची कृपा', 'दादांची पुण्याई', तात्यांचा आशीर्वाद, अगदी काही नाही म्हणलं तरी 'हॉर्न ओके प्लीज' एवढी तरी अक्षरे प्रत्येक ट्रकवर लिहीलेली असतातच. पण आपण थोडंसं अधिक लक्ष घातलं तर अक्षरश: अभिजात वाङ्मय आपल्यापुढं खुलं झालेलं दिसेल. 'कृपा कर आई-पंढरीचे विठाबाई' किंवा सखा माझा ज्ञानेश्वर - सुखाचा सागर' ही वाक्यं जशी भक्तीभाव दर्शवितात. तसंच 'देवा, सगळ्यांचं भलं कर,पण सुरूवात माझ्यापासून कर.' असा बेरकीपणा दाखवणारी वाक्यही आपल्याला वाचायला मिळतात. 'नजर हटी दुर्घटना घटी' किंवा 'जजमेंट फेल तो येरवडा जेल' असा धोक्याचा संदेश देणाऱ्या वाक्यांबरोबरच, अगर ड्रायव्हरने नशा कर डाला, तो समझो फोटोपर चढ गयी माला. ' असंही सांगायला ट्रक मागेपुढे बघत नाहीत. 'मेरी चली तो तेरी क्यों जली?' हे विचारणारा ट्रक जसा भेटतो तसंच 'हँस मत पगली - प्यार हो जाएगा' असं सांगणारा ट्रक आपली छान करमणुक करतो. 'तु भारी तर जा घरी' अशी समज देणाऱ्या संदेशाबरोबरच 'बघतोस काय? - मुजरा कर!' अशी दटावणी करणारा संदेश आपल्याला ट्रकवरच वाचायला मिळेल.

तुमचं निरीक्षण बऱ्यापैकी असेल तर एक गोष्ट तुमच्या लक्षात येईल की, एखाद्या वाहनानं साईड न देणं किंवा ओव्हरटेक करून पुढे जाणं या गोष्टी जातीवंत ट्रकड्रायव्हरला फार मनस्ताप देतात. या चढाईखोर वृत्तीचं दर्शन 'हिम्मत है तो ओव्हरटेक कर - वरना बरदाश्त कर' किंवा 'बघतोस काय रागानं - ओव्हरटेक केलंय वाघानं' या संदेशातून हमखास घडू शकेल. 'बच्चे शेर का पिछा नही करतें' हे वाक्यही याच मुशीत तयार झाल्याचं जाणवते. 'प्रत्येक गोष्टीला अंत आहे, म्हणूनच मी शांत आहे.' हे वाक्य कुठे वाचायला मिळालं असेल असं तुम्हाला वाटतं? अहो पुण्यात! पुणे परिसरात वाचायला मिळालेले संदेश वाचून तुमचीही करमणूक होईल. परवाच सीटी बसमधून जाताना एका सिग्नलला गाडी थांबली. पुढ्यातच एक ट्रक उभा होता. त्यावर लिहिलं होतं. 'अं हं घाई करायची नाही-तुमच्या हॉर्ननं सिग्नल बदलत नाही! पटलं का मी काय म्हणतोय ते!' आणखी उदाहरणं पहा. एक ट्रक म्हणतो - 'माझ्याशी पैज लावू नका - लय भारी पडेल' आणि पुढे बारीक अक्षरात लिहिलं होतं, 'ड्रायव्हर शिकत आहे!' तर दुसऱ्या ट्रकवरचा संदेश होता, 'हे तुम्हाला वाचता येत असेल तर तुम्ही फार जवळ आलेले आहात ...... सुरक्षित अंतर राखा.' पुणेकरांशिवाय असे कोण लिहिणार? 'तुमचं लक्ष आमच्याकडं का?' असं विचारणारा जसा ट्रक भेटतो तसंच 'भिऊ नकोस, मी तुझ्यापुढे आहे.' असे सांगणारा ट्रकही मला पुणे परिसरात भेटला.

पूर्वी एकदा 'मिनी राजस्थान'च्या ट्रिपला गेलो होतो. त्यावेळी माझ्या खजिन्यात खूप भर पडली. एका ट्रकवर लिहिलं होतं, -'ये रास्ते पहाडके, चढना सँभल सँभल के' 'हड्डी भी नजर न आएगी, गीर जाओगे तो फिसलके' तर दुसरा ट्रक सांगत होता. 'फिक्रमत कर बंदे, ये दिन भी गुजर जाऐंगे, हँसी हसनेवालों के चेहेरे उतर जाएंगे'

दुसऱ्याच्या मुखावरील आनंद मावळून जाण्यात त्याला काय मिळणार होतं हे त्यालाच ठाऊक! 'कितने भी खरीद ले हिरे मोती, लेकिन कफन को जेब नही होती!' हे तत्त्वज्ञान सांगणारा ट्रक जसा भेटला तसाच मनाला चटका लावून जाणारा ट्रकही याच सहलीत भेटला. या ट्रकवर लिहिलं होतं, 'खुदा गारद करे, मोटर बनानेवालोंको! घर से बाहर कर दिया मोटर चलानेवालों को!' दिवसरात्र ट्रकवर काम करणाऱ्या ड्रायव्हरचं आयुष्य घरादाराला कसं मुकलेलं असतं ही व्यथाच तो सांगत नव्हता काय?' छोड दो. एक विनोद सांगतो, ट्रकवर लिहीलं होतं. 'सविता, सुनिता, बबिता...... स्टेट बँक की सौजन्यसे' बँकेत तीन तपे नोकरी करूनही असलं सौजन्य प्रथमच पाहत होतो.

'लायनीत घे ना भौ.' किंवा 'पहा..... पन प्रेमाणे' हे वाचलं की गावाकडचा माणूस भेटतो तर 'योग्य अंतर ठेवा .... वाहनांमध्ये आणि मुलांमध्ये.' हे वाचताना भारदस्त माणसांची मूर्ती उभी राहते. नुकताच एक डोकं खाजवायला लावणारा संदेश वाचला. '१ १३ ६रा' काही केल्या तिन्ही आकड्यांचा एकमेकांशी संबंध काय हे लक्षात येईना. शेवटी या कुलुपाला 'रा' ची किल्ली मिळाली आणि संदेश झळकला 'एक तेरा सहारा'

या संदेशाच्या संदर्भात अन्य प्रकारची वाहनं खूपच मागे. एस.टी.चा कारभार तर रूक्षच. तरीही एका एस.टी,बसवर 'वाट पाहिन.... पण एस.टी.नंच जाईन' हा संदेश तर दुसरीवर 'तुमच्या वाहनात ऊस कापूस कणसं! माझ्यात मात्र लाख मोलाची माणसं! हा संदेश वाचून धन्यता वाटली आणि एस.टी तरी आपल्याला लाख मोलाची समजतीय हे पाहून हात उगाचच कॉलरकडे गेला. ट्रकवरचा हा साहित्याचा खजिना सताड् उघडा आहे, पण प्रवास करताना गाडीत बसून डुलक्या खाण्याऐवजी ट्रकवर टक लावून बसलात तर अशी कितीतरी रत्नं आपल्या संग्रही जमा होतील. आणि फार मोठं समाधान लाभेल. कारण 'समाधान हीच संपत्ती' असंही एक ट्रकच सांगतो.

**५१/१५** **गोविंद करमरकर, मो. ८८०५९५९८२४**

गीत रामायण

# काव्य नव्हे हा अमृतसंचय

'कला-संस्कृती-उद्यम कधी न जेथे उणे' अशा एके काळी विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्याचे ग्रामदैवत कसबा गणपतीच्या परिसरात माझा जन्म झाला. तरी गिरगावातील झावबाच्या वाडीमधलं हरिभाऊंचं राम मंदिर माझं आजोळ म्हणून असेल कदाचित, आज दोन-अडीच हजार वर्षांहूनही अधिक काळ भारतीय जनमानसावर अधिराज्य गाजविणाऱ्या रामायणाचा चरित्रनायक मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाविषयीची श्रद्धा मनाच्या गाभाऱ्यात कुठे तरी खोलवर रुजलेली असावी. त्यामुळेच शालेय जीवनातील संस्कारक्षम वयात आधी पुणे आकाशवाणीवरून, मग बाबूजींच्या प्रत्यक्ष कार्यक्रमातून, नंतर ध्वनिमुद्रिका- ध्वनिफितीतून, दूरदर्शन व खासगी वाहिन्यांवरून गीतरामायण किती वेळा कानांवर पडले त्याची गणतीच नाही.

'चैत्रमास त्यात शुद्ध नवमी ही तिथी' अशा हिंदू नववर्षाचा आरंभ होणाऱ्या चैत्र पाडव्यानंतर नऊ दिवसांनी अर्थात रामनवमीला गुरुपुष्यामृत योग आला. शब्दांपेक्षा अधिक बोलक्या आकड्यांच्या भाषेत सांगायचे झाले, तर आज सत्तरीची वेस ओलांडलेल्या पिढीच्या आयुष्यात साठ वर्षांपूर्वी 'पातली महद्भाग्यवेला' असंच म्हणायला हवं. १ एप्रिल १९५५ ते १९ एप्रिल १९५६ अशा दोन रामनवमींच्या मध्ये 'गीतरामायण' नामक महाकाव्यातील आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून प्रसारित झालेल्या गीतांनी महाराष्ट्रातील 'प्रत्येक घराला व घरातील प्रत्येकाला' अक्षरश: मंत्रमुग्ध केले. आज सहा दशकांनंतरही त्या अलौकिक व अनुपमेय गीतांनी मराठी जनमानसावर घातलेली जनसंमोहिनी तसूभर किंवा सुतभरही कमी झालेली नाही. कारण गीतरामायण म्हणजे 'काव्य नव्हे हा अमृतसंचय'.

आज साठ वर्षांच्या वैभवशाली कालखंडाचा मागोवा घेताना लक्षात येते, की गीतरामायणाची लोकप्रियता हा केवळ योगायोग नव्हता. लेखन, स्वरनियोजन व गायन यांचा गंगा, जमुना, सरस्वती यांचा तो एक त्रिवेणी संगम होता. हस्तिनापूर सम्राट अंध धृतराष्ट्र महाराजांना दिव्यदृष्टी लाभलेला संजय महाभारतातील कुरुक्षेत्रावरील प्रत्यक्ष युद्धाचे वर्णन ऐकवतो. त्याचप्रमाणे 'महाराष्ट्राचे कालिदास' गजानन दिगंबर उर्फ अण्णासाहेब माडगूळकर यांची 'गीतरामायण' व 'गीतगोपाल' ही दोन्ही महाकाव्ये निवेदकाच्या माध्यमातून साकारतात. अयोद्धानगरीत अश्वमेध यज्ञमंडपात लव-कुश साक्षात प्रभू रामचंद्रांच्या समोर श्रीरामचरित्राचे गायन करतात व त्यातील प्रत्येक प्रसंगाचे निवेदक वर्णन करतो. अशा कल्पनेतून गीतरामायण साकारले. तसेच 'शरच्चंद्रिका मूक हुंकार देते वनी राधिका गीतगोपाल गाते' अशा गीताने 'गीतगोपाल'चा आरंभ होतो.

ग. दि. माडगूळकर नावाचे आधुनिक वाल्मीकी व 'रामचंद्र' विनायक ऊर्फ सुधीर फडके अशा गीतकार व संगीतकार जोडगोळीचे 'न भूतो न भविष्यति' असे एकमेव व अद्वितीय 'शब्दस्वरशिल्प' म्हणजे 'गीतरामायण'. महाभारतासाठी चौदा विद्या व चौसष्ट कलांची आद्यदेवता व बुद्धिदाता श्रीगणेश व्यास महर्षींचे लेखनिक झाले, तर खुद्द माडगूळकर कुलोत्पन्न गजाननाच्या दैवी लेखणीतून गीतरामायण साकारले. आकाशवाणीवरून प्रत्यक्ष प्रसारित होईपर्यंत जवळजवळ प्रत्येक गीत श्रोत्यांना, गायक-गायिकेला किंवा संगीतकारालाच नव्हे तर स्वत: गीतकारालाही अनपेक्षित असायचे. शुक्ल पक्षातील प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे प्रत्येक गीत गात गात जन्माला आले, वाढले व अखेरीस पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राप्रमाणे गीतरामायण परिपूर्ण झाले असेच म्हणायला हवे. गीतरामायण म्हणजे महाराष्ट्र शारदेच्या गळ्यातील छपन्न हिऱ्यांचा लखलखता रत्नहार आणि त्यातील प्रत्येक गीत म्हणजे 'हिरकांच्या मेळाव्यात नीलमणी उजळतो.' किंबहुना गीत रामायणाच्या बाबतीत आमच्या पिढीची स्थिती 'सात जन्मांची पुण्याई म्हणुनीच झालो पालखीचे भोई' अशीच होती.

पण प्रश्न असा पडतो, की बहुतांशी चंदेरी दुनियेत गीतकार, पटकथा-संवाद लेखक, निर्माता, अभिनेता अशा अनेक भूमिकांमध्ये वावरलेल्या गदिमांच्या लेखणीतून 'गीतरामायण' कसे साकारले असावे? एरवी स्वत:विषयी फारसे न बोलणाऱ्या या महाकवीने 'ज्ञानियाचा वा तुकयाचा तोच माझा वंश आहे, माझिया रक्तात काही ईश्वराचा अंश आहे' अशा शब्दांत या प्रश्नाचे उत्तर दिले होते. तर गीतगोपालमध्ये 'अजन्मा जन्मासि आला' अशा शब्दांत कृष्णजन्माचे वर्णन करणारी गदिमांची प्रतिमा देवासाठी 'अजन्मा' शब्द वापरणाऱ्या संत एकनाथांसाठी थेट नाते का व कसे सांगून जाते? गदिमांच्याच शब्दांत 'निर्मिती मुनी वाल्मिकींची, कथा ही रामजानकीची' अशी सहज-सुंदर व प्रासादिक निर्मिती म्हणजे गीतरामायण. 'महाराष्ट्र वाल्मीकी'ने गीतरामायणाच्या निर्मितीची सांगितलेली पूर्वपीठिकाही थक्क करणारी आहे.

छंद जाणतेपणीचा तीर्थे काव्याची धुंडली, कोण्या एके काळी पूजा रामाची बांधली। झंकारल्या कंठवीणा, मिळे चांदण्याला सूर, भावमाधुर्याला आला महाराष्ट्री महापूर, देववाणीतील तेज शीतळले माझ्या ओठी, वाल्मीकीच्या भास्कराचे झाले 'चांदणे मराठी'.

महर्षी वाल्मीकींच्या सात कांडांतील चोवीस हजार ओव्यांचे संस्कृत रामायण केवळ छपन्न गीतांतून मराठीत शब्दबद्ध करणे

म्हणाजे शिवधनुष्य पेलण्यासारखेच कठीण होते. पण शब्दप्रभू गदिमा व स्वराधीश बाबूजी या दोघांनी 'गीतरामायण' नावाचे शिवधनुष्य केवळ पेललेच नाही तर त्याचे इंद्रधनुष्य केले. नायगारा धबधब्याभोवती चोवीस तास फुलणाऱ्या इंद्रधनुष्यातील सप्तरंगांनी व प्रत्येक रंगातील विविध छटांप्रमाणे गीतरामायणातील गदिमांचे प्रत्येक गीतातील शब्द आणि त्यावरील बाबूजींचा स्वरसाज, गायक, गायिकांचे योगदान 'सात स्वरांच्या स्वर्गांमधुनी, नऊ रसांतील नऊ स्वरधुनी' असा जणू कन्याकुमारीचा तीन महासागरांचा महासंगम. गीतरामायणाच्या संदर्भातील प्रत्येक मराठी संगीत रसिकाला अभिमान वाटावा अशी गोष्ट म्हणजे या महाकाव्याचे संस्कृत, गुजराती, कन्नड, तेलुगू अशा अनेक भारतीय भाषांत भाषांतर झाले, पण एकाही संगीतकाराला संगीताच्याच परिभाषेत सांगायचे, तर 'कानामात्रेचाही' फरक करावासा वाटला नाही.

पंचवटी बंगल्यामधील गदिमांची 'गीतरामायण' लिहिण्याची खोली, ते जिथे बसायचे तिथले मोरपंखी रंगाचे सोफे, प्रत्येक सोफ्यावर श्रीरामांचा व गदिमांचा फोटो असे सगळे 'याचि देही याचि डोळां' पाहिले आणि 'लागो न दृष्ट माझी माझ्याच वैभवाला' अशी माझी स्थिती झाली. श्रीरामांच्या व गदिमांच्या फोटोनुसार नतमस्तक होताना गतजन्मीचे सुकृत काय असू शकते याची कल्पना आली.

नंतर दोन-चार वर्षे तशीच गेली आणि गेल्या वर्षी पुन्हा एकदा तशी इच्छा व्हायचे कारण म्हणजे त्याच्या प्रसारणाच्या हीरक महोत्सवाचा शुभारंभ. पण प्रश्न असा होता, की 'संध्याछाया भिवविति हृदया' अशा वयात आपल्याला संधी तरी कोण देणार? पण तोही योग अचानक व अनपेक्षितपणे जुळून आला. माझे स्नेही निवेदक व सूत्रसंचालक प्रदीप भिडे दै. नवशक्तीचे संपादक प्रकाश कुलकर्णी यांच्याशी बोलतात काय व अक्षरश: आठ-दहा दिवसांत रविवारच्या 'ऐसि अक्षरे रसिके' पुरवणीत 'काव्य नव्हे हा अमृतसंचय' सदर सुरू होते काय, सगळे काही ते 'स्वप्न एक होते स्वप्नात पाहिले'सारखे स्वप्नवत. २७ एप्रिल २०१४ ते ८ मार्च २०१५ हा जवळजवळ वर्षभराचा काळ सर्वार्थाने आयुष्य समृद्ध करून गेला. वृत्तपत्रात सदरलेखन करण्याची पहिलीच वेळ असल्याने मनावर प्रचंड दडपण होते. पण 'सर्गामागुनि सर्ग चालती' असा 'भूप ते भैरवी' प्रवास सुरू झाला आणि बघता बघता संपलाही.

२८ मार्च २०१५ च्या रामनवमीला तिथीने व १ एप्रिल २०१५ रोजी तारखेने गीतरामायणाच्या प्रथम प्रसारणाला ६० वर्षे पूर्ण झाली. गीतरामायणाच्या संकल्पनेचे जनक सीताकांत लाड, ती प्रत्यक्षात आणणारे पुरुषोत्तम लाड, गीतरामायण शब्दबद्ध करणारे ग. दि. माडगूळकर, स्वरबद्ध करणारे सुधीर फडके, त्यातील गजानन वाटवे, राम फाटक, माणिक वर्मा, मंदाकिनी पांडे यांच्यासारख्या गायिका, वादक व तंत्रज्ञ असे बहुतांश कलावंत कालौघात 'मरण कल्पनेशी थांबे तर्क जाणत्याचा' हे शब्द खरे करून रामचरणी विलीन झाले आहेत. त्यामुळे या सर्वांना गीतरामायणाच्या अर्पणपत्रिकेतील

'गेला जो वैकुंठी होऊन नि:संग ठेवुनी अभंग स्मृती मागे,
स्मृतीस आपुल्या प्राज्ञ भागवताची अर्पियली कथा राघवाची'

अशा भावपूर्ण शब्दात श्रद्धांजली वाहणेच फक्त आपल्या हातात आहे.

**३१/१५** **मुकुंद सराफ, मुंबई.**

## देवाची करणी

देवा तुझ्या निळ्या डोळ्यांमधूनी
कारूण्य रसाचे झरे वाहती
तुझे भक्तजन तुझ्या कृपेच्या प्रभावाने
चिम्ब, चिम्ब न्हाऊनीया निघती

तुझ्या चरणांवर नतमस्तक होता
मीपण माझे निघुनी जाते
जडत्त्व आलेल्या माझ्या देहावरती
मायेचे तुझ्या पांघरूण पडते

टाळ मृदुंगाच्या गजरात तुझे भजन जेव्हा चालते
वेगळ्या दैवीक कंपनाने देऊळ सारे व्यापून जाते
आयुष्याच्या संध्याकाळी जीर्ण माझ्या देहाला
मृत्युचे ना कसले भय मग उरते

**१३/१५** **दिलीप रेडकर (गोरेगाव)**
**दूरध्वनी - २८७३५६१३**

## मुक्याचे बोल




**श्री. वसंत करंबळेकर, रत्नागिरी**
**मोबा. ९४२२३८२०३६**

## चंद्र नभीचा ढळला



चंद्र पुनवेचा, चंद्र अष्टमीचा
यावच्चंद्रा, तू चित्त चकोरा
चंद्रानना, चंद्रमुखी अन् किती
नामे तुझिया युवती मिरविती ॥१॥
किती किती रूपे दाविशी,
हितगूज तुझे प्रेमी युगुलांशी
गोड रात्र ती मधुचंद्राची
विसरतील ते का रे कधी ॥२॥
नित्य उगवणे आणि मावळणे
ताऱ्यांसवे नभात रमणे
सूर्याशी ना देणे घेणे
प्रतिमासी एकदाच रुसणे ॥३॥
स्पर्धा नसे तुझी कोणाशी
रूप..सौंदर्य तुझे तुजपाशी
एकच सुट्टी तुज अमवासी
तुजविण धरती राही उपाशी ॥४॥
अवकाशी तू छंद मुक्त
अवसेला का होतोस लुप्त
होऊन कधी बंधमुक्त
अवतरशील का धरतीवरी ॥५॥
माणसाने घेतला ठाव तुझा
जरी अंतराळी दूर वास तुझा
अंतराळवीर-आर्मस्ट्रॉंग
आठवतो का रे तुला? ॥६॥

**प्रभाकर कानिटकर**

**११३/१४ मो.: ९८८११९९१९९**

## उतराई

हे जीवन अपुले एक उधारी आहे
ते जगण्याची ही रीतच न्यारी आहे
जे अशक्य ऐसे वाटत होते मजला
ते सुख आनंदे दारी आले आहे
मज नव्हते गमले पहाट होईल ऐसे
परि प्रकाश पसरे मना उभारी आहे
हे माझे जीवन केले सुखकर ज्याने
त्या अनामिकाचा मी आभारी आहे
मज दुःखसागरातून आणिले तीरी
ही प्रेमळ प्रभूची किमया सारी आहे
मी भगवंताचा होऊ कसा उतराई?
भक्तीत रमावे हीच तयारी आहे

**सुभाष सरदेशमुख**

**३४/१५ मो. ९४२०४८५५६३**

## 'बहुरूपिया'

बेटी बनकर खुशियाँ लाये
दो परिवारोंका मिलन कराये।
बहना बनकर हर भाईका
लाड-प्यारसे शुभचिंतन करे।
बहू बनकर परिवार के
हर सदस्यका सुख दुःख बाँटे।
भाभी बनकर नोक झोक से
सब की मन-भावन बने।
जेठानी बनकर इतराने हुओ
परिवारका मानसन्मान बनाये रखे।
बीबी बनकर जीवन साथीका
सुख दुःखमें भी साथ ना छोडे।
माँ बनकर फले फुले
गोदमें विश्वका प्यार समेटे।
सास बनकर तेवर दिखवाके
घरकी मान मर्यादा बनाये रखें।
दादी बनकर झूमे नाचे
फिरसे बचपनका अनुभव करें।
हर मोडपर ऐसे औरत
बहुरूपिया स्वाँग रचाये।
पर स्वाँग के पिछे छिपा
असली चेहरा कभी ना दिखवाये।


**सुषमा तिळवे, गोवा**

**९/१५ मोबा. : ९८२३०५३७५१**

## दुःख- दुणे/उणे

जरा पाहिले इकडे तिकडे, दिसतो दुःखाचा डोंगर
दुःख माझे मग ठरे फिके, मना वाटते किती बरं!
कितिक गांजले दारिद्र्याने, पोट कितींचे हातावर
लज्जा-रक्षणा नाही चिंध्या, छप्पर नाही डोईवर
धनाढ्य नसलो तरीही मजला, घास मिळे हो पोटभर
दुःख माझे मग ठरे फिके, मना वाटते किती बरं! ॥१॥
अनेक ग्रासले बहु-व्याधींनी, आजार कितींचे अति दुर्धर
खिशात नाही दमडी त्यांचे, आयुष्य लागते पणावर
करिती वेदना व्याकुळ जेव्हा, इलाज लाभे मज सत्वर
दुःख माझे मग ठरे फिके, मना वाटते किती बरं! ॥२॥
नाही ललाटी अपत्य ज्याच्या, उदास राहे जीवनभर
सहचराची विरह-वेदना, लावी जीवाला हुर-हुर
मी आसुसलो जरि आप्तांसाठी, परदेशी जे दूरवर
दुःख माझे हो ठरे फिके, मना वाटते किती बरं! ॥३॥
कराल तुलना जर कळसाशी, भासेल दुःख हो मूठभर
गर्तेतील तो पाया दाविल, तेच दुःख तुम्हा चिमूटभर!

**गोविंद करमरकर - मो. ८८०५९५९८२४**



# बंधमुक्त

एका ढगाळ सकाळी दोन कावळे माझा पाठलाग करीत होते. माझी शिकार करण्याचा प्रयत्न करीत होते. मी लहान कच्चा बच्चा जिवाच्य आकांताने एकदम जमिनीकडे झेप घेतली. त्याठिकाणी ७/८ माणसे एकत्र बागेत बसली होती. त्या बागेतल्या बाकामागच्या भिंतीच्या कोपऱ्यात मी लपलो. तेथे कावळे येणे शक्य नव्हते. कावळ्यांपासून मी बचावलो खरा. त्या ७/८ जणांपैकी एकाने मला पाहिले. मी आडोश्याला लपलेला, घाबरलेला. थरथर कापत होतो. सर्वांनी मला पाहिले. काहींनी माझे फोटो काढले. त्यांच्यापैकी एकाने माझ्यावर रूपाल टाकून मला पकडले आणि स्कूटरच्या डिक्कीत ठेवीन मला घरी नेले. त्याला मी खूप आवडलो होतो. त्याच्या घरी पोहोचेपर्यंत डिक्कीमध्ये सुटकेसाठी आरडाओरड करीत होतो. त्याने त्याच्या पत्नीला सांगितले मी एक सुंदर पक्षी घरी आणलाय बघ. त्याने एक जाळीची टोपली, पेरू, मिरचीचा फराळ माझ्यासाठी आणला. स्कूटरची डिक्की उघडून पत्नीला मला दाखविले. तिलाही माझं रंगरूप, देखणेपण आवडले. प्रथम जाळीच्या टोपलीत, नंतर पिंजऱ्यात ठेवून मला पाळायचा त्यांचा विचार होता. हे सर्व मी जाणले होते. डिक्कीतून मला पकडण्यापूर्वी पंखात बळ एकवटून मी उंच भरारी मारली आणि त्यांच्या बंगल्यातील एक झाडावर १०/१५ मिनिटे बसलो. ते जमिनीवरून आणि मी झाडावरून एकमेकांना पहात होतो. मी त्या दोघांना ओरडून टा-टा केला आणि बाजूच्या उंच झाडावर झेप घेतली आणि बंधमुक्त झालो. हे एका सुंदर पोपट पिल्लाचे कथन.

मॉर्निंग वॉक झाल्यावर बागेत थोडी विश्रांती घेत असता पोपटाचे छोटसं पिल्लू, त्याचा रंग निळा जांभळा. पंखांना लाल झालर मोती रंगाची बाकदार टोकदार चोच. गळ्यात पांढऱ्या रंगाचा मफलर जणू (गोल पट्टा) इतर पोपटांमेक्षा त्याचा थाट. रूबाब वेगळाच होता. त्याला मी पकडला. घरी आणला.

असा विलक्षण सुंदर पोपट मला खूप भावला होता.

माझ्या हातून तो निसटून (Escape) गेला म्हणून मी क्षणिक नाराज झालो, परंतू पिंजऱ्याच्या तुरूंगात रहाण्यापेक्षा त्या पोपटाने युक्तीने निसर्गात स्वैर स्वच्छंदी मुक्त संचारासाठी उड्डाण केलं. बंधमुक्त झाला याचं मला खूप समाधान वाटतं.

६१ **प्रभाकर कानिटकर**

मो.९८८११९९१९९

## ज्येष्ठांचा महिमा



ज्येष्ठ जणू वटवृक्ष
ज्येष्ठ कनिष्ठांचे आधारवड
अविचल, अखंड राहून
शीतल छाया देणारे ||१||
ज्येष्ठांचा अनमोल सल्ला
दलदलीतून निर्मळ झऱ्याकडे
जाणारा रस्ता कनिष्ठांना मार्ग दाखवून
संकटसमयी भक्कम आधार देणारा ||२||
ज्येष्ठांची माया
जणू दूधावरची स्निग्ध साय
स्वत: जळून, इतरांना मलम लावणारी ||३||
ज्येष्ठांचे कर्तृत्व
थोर पुरुषासारखे
उपेक्षा सहन करून
ज्ञानदानाचा मार्ग दाखविणारे ||४||
ज्येष्ठ हे कनिष्ठांपेक्षा श्रेष्ठ
देवतुल्य, सन्माननीय, पूजनीय
त्यांना आपण वंदन करूया
चला, त्यांचा आशीर्वाद घेऊ या ||५||

**सौ. संध्या परदेशी, औरंगाबाद.**
**१९/१५ मो. ९३२५२१८१२२**

## स्वप्न

मनी असे ते स्वप्नी दिसे, निद्रेत क्षणिक सत्य भासे
मनी नसे तेही स्वप्नी दिसे, स्वप्नांचा हा खेळ असे ||१||
स्वप्न पाहणे गैर नाही, सत्यात उतरणे सोपे नाही
स्वप्न कोणा हाती नाही, दुसऱ्यास समजणे शक्य नाही||२||
होतो अचानक स्वप्नभंग, आणिक होते मती गुंग
होतसे रंगाचा बेरंग, तरी राही स्वप्नसृष्टी अभंग||३||
शांत निवांत रात्र असावी, स्वप्नं सुंदर छान पडावी
रंजन गुंजन होण्यासाठी स्वप्नांची मालिका हवी||४||
भेटती स्वप्नी मित्रमैत्रिणी, आहेत जे नाहीत जे
ज्ञात अज्ञात बहू भेटती, स्वप्न सुंदर माध्यम ते||५||
रम्य निसर्ग नच पाहिला, स्वप्नी येईल भेटीला
स्वर्गीय सुख सहज गवसते, कशास जावे काश्मिरला||६||
एक फसवे स्वप्न होते, बडा बॉस झालोय मी
जाग येता मला कळाले, अजूनही बाबूच मी ||७||
दीर्घ स्वप्नी मला एकदा, लागली लाखोंची लॉटरी
स्वप्न भंग होता सकाळी, लॉटरी तिकिटे फाडली ||८||
खूप स्वप्ने पाहिली मी, सत्यात काही उतरली
जी नाही उतरली, पुन:श्च पुरून उरली ||९||

**प्रभाकर कानिटकर, कोल्हापूर**
**६७/१५ मो. ९८८११९९१९९**

# Snap shots of the Annual General Meeting held at Nagpur on 23rd August 2015



Shri. D.A.Kulkarni, Treasurer, presenting the Financial Statements for approval in the Annual General Meeting



Shri.R.N.Lalingkar being felicitated with 'Late Shri.L.N.Pabalkar Gold Medal' & Scroll by President Shri.S.B.Gokhale



Shri. P.K.Choube being felicitated at the hands of President Shri. S.B.Gokhale with 'Shri. N. G. More Service Award'



Shri. Y.P.Naniwadekar being felicitated at the hands of Shri. B.G.Dandekar with 'Shri.N.G.More Service Award'



Shri.T.M.Patil being felicitated at the hands of Shri.S.B.Gokhale with 'Late Shri.Vasudeo V. Gandhe & Smt.Umabai V. Gandhe Puraskar'



Shri.P.A.Lopes being felicitated at the hands of Shri.S.B.Gokhale with 'Late Shri Vasudeo V. Gandhe & Smt.Umabai V. Gandhe Puraskar'

OCTOBER - 2015 SAMVAD

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession Register No. PCW/151/2014-2016**
**Licence to Post without Prepayment No.WPP - 22 at Market Yard P.S.O. on 25th of each Month and published on 25th of the month**



Shri.Mohinder Singh Sawhney addressing the gathering



Shri.Sudhir Pawar,Jt.Secretary welcoming the audiance



Section of the audiance



Shri.C.N.Vazirani being felicitated by Shri.S.B.Gokhale

सूचना : १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातींतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.

२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

Thane Office Address : A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

To,

**If Undelivered Please Return to :**
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030. Phone : 24332141**

**Publisher** – Shri.Vilas Vasudeo Gandhe, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.